साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ...............................4as

Advertisemen
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII | AKOLA MONDAY 7 MARCH 1898 | NO 10

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख ७ माहे मार्च सन १८९८ इ० | अंक १०

नोटीस

चि. रा रामलाल, दर्शनलाल, चंदनलाल, हिरालाल वल्लद मातादीन व ती. मातोश्री जवजे मातादीन राहणार जळगांव जामोद या सर्वास मी पुरणलाल मातादिन राहणार जळगांव जामोद या नोटीशीनें सर्वांस असें कळवितों कीं तुह्मी मजला ता. २१-२-९८ इसवीची चि. दर्शनलाल मातादीन या सहीनें शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रां मध्यें नोटीस दिली ती पावली त्यांतील मजकूर सर्व समजला नोटीशींत लिहिलेला मजकूर सर्व खोटेपणाचा आहे. कै. ती. मातादीन यांस मयत होऊन अजमासें दोन वर्षे झालीं. वडिलार्जित स्थावर व जंगम आणि गहाण व रोकड व्यापार वगैरे मिळून सर्व इस्टेट अजमासें वडिलार्जित आहे ती तपशील लिहिले प्रमाणें:—

इस्टेट जंगम

| सोनें | चांदी | रोकड |
|---|---|---|
| तोळे ३०० | अजमासे तोळे | पंचवीस ह |
| येहेरा चौदाशें | तीन हजार | जार |
| १४०० | ३००० | २५००० |

भांडेंकुंडें कपडालत्ता मिळोन हजार १००० रु.

जनावेरें व गाड्या वगैरे मिळून अदमासें रु. १५००.

व्यापारांतील इस्टेट

गहाण व रोकडीचा व्यापार मिळून अदमासें रु. ६०००.

स्थावर इस्टेट.

जमीन जुमला वडीलार्जीत व शिवाय त्यांचे मार्गे मी खरेदी केलेली जमीन अदमास रु. ३०० तीनशे रु. साऱ्याची भाडेपट्ट्या सहीत व राहते घर येणें प्रमाणें वडिलार्जित इस्टेट आहे ती तुह्मा आह्मा सर्व बंधूच्या ताब्यांत आहे.

वडील वारल्या पासून आज मित्ती पर्यंत माझे कारकिर्दींत उत्पन्न झालें तें घरांतील सोने चांदीची विक्री, व्यापारांतील वसूल व शेतीचें उत्पन्न आज मित्ती पर्यंत रु. ४२६५ या शिवाय तुह्मा सर्वांनी मिळोन मजला न कळत जे कांहीं उत्पन्न केलें असेल व सोनें चांदी व लोकाकडून येणे वगैरे व वडिलार्जित इस्टेटी पैकीं जें कांहीं तुह्मी घेतली असेल ती असें मिळोन.

खर्चाची बाब माझ्या हातानें मी केला तो; वडील वारल्या पासोन आज पावेतों वडीलाचें उत्तरकार्य गयावर्जन काशी यात्रा वगैरे मिळोन अदमासे रु. खर्च झाला तो व प्रापंच खर्च 'मिळोन रु............४५००
या शिवाय शेतसारा व शेतें खरेदी व वडिलोपार्जित शेताची दुरस्ती वगैरे अंदाजानें खर्च रु. ४७६५.

येणें प्रमाणें वडील वारल्यापासून आजतागाईत माझे हस्तें खर्च झाला तो सदरीं नमुद केल्या प्रमाणें आहे. सदरीलें सर्व प्रपंचाची उलाढाल व व्यवस्था करण्या करितां मजला सध्या पांच हजार रुपये कर्ज झालें आहे

वडील मेल्या मागें तुह्मी सर्वांनीं माझे हुकमतींत राहून सज्ञान होई तों पर्यंत माझे विचारानें राहण्याचें असून तसें न करितां फंद देणाऱ्या लोकांचे ऐकून सर्व प्रकारानें कमीपणा मात्र करून घेत आहां. वडिलार्जित स्थावर जंगम इस्टेटी बद्दल मातोश्री खेरीज करून तुह्मा आह्मा सर्वांचा हक्क सारखा आहे मातोश्रीचा हक्क वडिलांनीं त्यांचे आंगावर घातलेले दागिनें व अन्नवस्त्राचा आहे ह्या खेरीज कोणत्याही प्रकारचा इस्टेटीचा फेरबद्दल करण्याचा मातोश्रीचा हक्क नाहीं मातोश्री व तुह्मी मिळून वडिलांचें मार्गे आज पावेतो स्थावर जंगम इस्टेटींत व शेती वगैरच्या उत्पन्नाला पुष्कळ प्रकारी अंदाधुंदी करून इस्टेट कमी केली आहे तर तुह्मांस या नोटिशीनें असें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून दहा दिवसांचे आंत गावांतील चार शेट सावकार व थोर गृहस्थ यांचे समोर सदरी नमूद केलेली वडिलार्जीत स्थावर व जंगम इस्टेट हजर ठेवावी व आह्मां सर्व अणा पैकीं ज्यांनीं ज्यांनीं वडीलाचें मागें जो जो कारभार केला असेल त्याचा हिशेब द्यावा व माझें पासूनही घ्यावा असें न झाल्यास रीतशीर तजवीज करणें भाग पडेल. ज्यांच्या कडून सदरील स्थावर जंगम इस्टेटीमध्यें अफरा तफर करून व आणखी इतर कारणांनी जी नुकसान होईल ती रीतशीर सर्व भरून घेतली जाईल. हे सर्वांस कळावें ह्मणून दिली नोटीस सही ता० ५-३-९८ इ०

सही

पुरनलाल मातादीनलाल कलाल रहाणार जळगांव ता० मजकूर जि० अकोलें दस्तुर खुद्द.

नोटीस.

नोटीस बेशमी सोनी मर्द सदु अवचार जात तेली हल्ली राहणार दहीहांडा ईस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी गंधर्वाची बायको असून आज सुमारें गंधर्व होऊन एक वर्ष झाले त्यात तु मजवळ ८ महिने होती व दिपवाळी निमित्यर्थ तुझ्या आई बापानें नेलें यास सुमारे चार महिने झाले. मी तुला नेण्याकरितां २-३ वेळां आलो होतो, परंतु तुझ्या बापानें आणून घालीन ह्मणून ह्मटले, परंतु आणून घातले नाहीं ह्मणून मी ८ दिवसापूर्वी तुला नेण्याकरितां आलो, माझ्या समागमें तुझी मावसी नामें तुळशी मर्द गणु तेली राहणार पारसी व माझा जावई नामें निंबाजी वल्लद एकोजी राहणार कनवे निंमगांव असे मिळून तिघेजण दहीहांड्यास तुला नेण्याकरितां आलो परंतु तुमचा सर्वांचा फंद फितूर होऊन तुझे मनांत दुसरा घरठाव करण्याचा विचार पक्का ठरला. व त्याप्रमाणें तेथील पांड्याच्या हस्ते माझ्या नावाची फारकत मला न कळत लिहून घेतली. व सही करण्यास दस्तऐवज मज समोर आणला परंतु माझ्या मनांत तुझ्यासी संसार करावा असें होते ह्मणून मी त्याजवर मुळींच सही केली नाहीं. तुझ्या मावसीच्या व इतर लोकांच्या सांगण्यावरून तुझे मन बिघडले व तू त्याच्या ह्मणण्यास रुकार देऊन मी प्रपंच करण्यास योग्य आहे हे तु जाणत असतांही मला नालायक ठरविले. हें तू बरोबर केले नाहींस. तर ही नोटीस पावतांच दीड महिन्याच्या आंत माझे जे तुझ्या आंगावर डागिनें असतील त्या सर्वांत तू माझे घरी नांदण्यास यावें. ते डागिनें खाली लिहिले प्रमाणें:—

| | वजन तोळे. |
|---|---|
| साखळी चांदीची. | २० |
| हातांतील कडे चार. | २४ |
| कानांतील बाळ्या (सोन्याच्या) | १ |
| गळसोळी मणी १२(सोन्याचे) | १ |

येणें प्रमाणें डागीनें आहेत त्या डागीन्यासह सदर्हू मुदतींत माझ्या घरीं नांदण्यास यावें असें न केल्यास व माझ्या परवानगी शिवाय खोट्या फारकतीच्या आधारें गंधर्व केल्यास फौजदारींत फिर्याद केली जाईल. व याबद्दल तू जो गंधर्व तुझ्यासी करील तो व त्यांत जे सामील असतील ते सर्वेच जबाबदार धरले जातील. व तुझ्या आई बापानें मजपासून तुझ्यासी गंधर्व लावण्याबद्दल घेतलेला पैसा व डागीनें व या नोटीसीचा खर्च आणि फिर्याद करण्यास जो खर्च लागेल त्या सहीत सर्व रुपये तुमचे पासून घेतले जातील. ह्मणून दिली नोटीस सही. कळावें, तारीख २७ माहे फेब्रुवरि सन १८९८ इसवी.

( सही )

सदु वल्लद शिवाजी तेली कजबे जळंब तालुकें खामगांव जिल्हा आकोला दस्तुर खुद्द.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस व जातभाई पंच लोकांस जाहीरात जिल्हे वऱ्हाड.

खाली सही करणार याजकडून जाहीर करण्यांत येत आहे कीं, सोनी मर्द सदु तेली अवचार जात तेली राहणार हल्लीं दहिहांडा ही माझी गंधर्वाची बायको आहे. तीनें कांहीं फितूर करून मौजे दहीहांडा येथें खोटी फारकती माझे नांवची केली व तिजवरून ती दुसरे गंधर्व करणार असें ऐकण्यांत आल्यावरून या जाहीरातीनें सर्वत्रास कळविण्यांत येत आहे कीं ती फारकती खोटी आहे. तिच्याशी कोणी गंधर्व करूं नये. सदर्हू फारकत माझे हातची मुळींच नाहीं. व माझा दस्तूर ही नाहीं करितां जाहीर करण्यांत येत आहे कीं, जो कोणी तिच्याशी गंधर्व करीन त्याजवर फौजदारि मोकद्दमा होऊन सालीम पैसा भरून घेतला जाईल. व याजबद्दल माझी खटपट सुरू आहे. करिता माझे कडून तिला गंधर्व करण्यास मनाई आहे. तरी कोणीही माझे परवानगी वाचून इच्यासी गंधर्व करूं नये. असे सर्वत्रास जाहीर करण्यांत येत आहे. ही जाहारात दिली. सही.

सही.

सदु वल्लद सिवाजी तेली अवसार कजबे जळंब तालुके खामगांव जिल्हे आकोला दस्तुर खुद.

नोटीस

बनाम मीरन वल्लद सयदलाल मुसलमान वस्ती मोजे इसापूर तालुके अकोट. यांस:-

खाली सही करणार प्रतापचंद देवलाल दुकानचा मालक देवलाल प्रतापचंद साहु दुकान तेल्हारे तालुके अकोट. यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुह्मी आमचे शेत मौजे वाडी तालुके अकोट येथील सर्वे नंबर ७० एकर ३।८८ आकार रुपये ६ १ चे किंमत रुपये १८९१ आठराशे एकावण रुपयास खरीदी घेतले आहे. सदर्हू शेताचा सवदा तारीख १०।१।९८ इसवी रोजी तेल्हारे येथें लखमीचंदजी लालचंद यांचे मारफत तुह्मी समक्ष केला आहे सदर्हू शेताची रक्कम सदर्हू तारखे पासून एक महिन्याचे आंत ह्मणजे तारीख १०।२।९८ पर्यंत देण्याचे ठरले असून त्या प्रमाणें तुह्मी रकम दिली नाहीं सबब तुह्मास दोन चार वेळीं मागणें केले असता तुह्मी आज उद्या देतों असे ह्मणून दिवस लोटीत आहा तरी आतां या नोटीसीनें सुचविण्यांत येतेकीं नोटीस पावल्या तारखे पासून चार दिवसाचे आंत सदर्हू रुपये व करारा नंतरचे व्याज दरशेकडा दरमहा २ रुपये प्रमाणें व ह्या नोटीसीचा खर्चासह रुपये आणून देऊन आमची पावती घेऊन जावी. व शर्तीं प्रमाणें तुह्मी आपले खर्चानें सेताचे खरीदीखत करून घेऊन सेत ताब्यांत घ्यावें. सदर्हू मुदतींत असे न केल्यास पुढें तुमचेवर फिर्याद करून कोर्ट खर्च व नोटीस खर्च व व्याजासुद्धां सर्व रकम भरून घेऊं. तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावे तारीख २८-२-९८ इसवी.

[ सही ]

सही देवलाल प्रतापचंद राहणार तेल्हार दस्तुर खुद्द.

नोटीस.

पुंजाजी वल्लद माहादाजी केवठी राहणार अडगांव प्रगणें मजकूर यांस.

नोटीस देणार तुकाराम वल्लद सखाराम राहटे पाटील यांजकडून

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला आपली कन्या दिली त्याजबद्दल मी तुह्मास तुमचे मुलीचें अंगावर डागीनें करण्याकरितां २०० रुपये दिले असून पंचाच्या रीती प्रमाणें मुलीचें हातीं रुपया ही दिला. त्यावरून गंधर्वाचा नेमही केला होता. तर त्या प्रमाणें झालें नाहीं. ह्मणून या नोटीसीनें कळविण्यांत येत आहे कीं तुह्मी मजला आंठ दिवसांचे आंत गंधर्वाचा नेम करावा. तसें न झाल्यास मी सरकार मार्फत दिलेले रुपये व सामान केल्याबद्दल रुपये, असे एकंदर रुपयांची फिर्याद करून भरून घेईन. कळावें तारीख ५-३-९७ इसवी.

सही

तुकाराम वल्लद सखाराम राहटे पाटील दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें खालीं सही करणार याजकडून असें जाहीर केलें जातें कीं तीर्थरूप मातोश्री जवजे मातादीन व चि० रा० रामलाल दर्शनलाल, चंदनलाल, हिरालाल या सर्वां बरोबर व यांपैकी कोणीही माझ्या संमती शिवाय गहाण व रोकड खरेदी अथवा विक्री, स्थावर व जंगम, अशा प्रकारचा कोणताही व्यवहार केल्यास त्याजबद्दलचे नुकसानीचें जबाबदार व्यवहार करणारास धरलें जाईल. हें सर्वांस कळावें. ह्मणून दिली जाहिरात सही ता० ५।३।९८ इ.

सही

पुरनलाल मातादीनलाला कलाल राहणार जळगांव द. खु.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाउसचा कर वसूल करण्याचा, आणि स्टेशन धर्मशाळेचा कर वसूल करण्याचा, सन १८९८।९९ सालचे हक्कांचा लिलाव तारीख २१ माहे मार्च सन १८९८ इ० रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें. ता० ४ माहे मार्च सन १८९८ इ०

K. G. Damle
सेक्रेटरी
म्यु. क. अकोलें.

---

## पत्रव्यवहार.

वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

आमच्या घरीं, पेन्शन घेतलेले एक गृहस्थ, त्यांची आमची ओळख असल्यामुळें, भेटावयास आले होते. त्यांचें व माझें स्त्रीशिक्षण, बालविवाह वगैरे संबंधानें, बरेच बोलणें झालें. परंतु मी, त्यांनीं (त्यांनीं पेन्शन घेतलें असल्यामुळें) तुमची आतां कोणतें काम करण्याची इच्छा आहे, असें विचारल्यावर, त्यांनीं जें उत्तर दिलें, तें प्रसिद्ध करण्यालायक आहे असें वाटल्या वरून, तें आपणांकडे प्रसिद्ध करण्यास पाठविलें आहे.

ते ह्मणाले—"आज २५ वर्षे आपल्या व कुटुंबाच्या सुखाकरितां सरकारची चाकरी केली; परंतु आतां इहलोकचे सुखप्राप्तीसाठीं न झटतां, परलोकच्या, सुखप्राप्तीसाठीं, झटावें, हें अधिक चांगलें. परंतु तें आपल्या हातून होणार कसें ? आपण कांहीं नामदार (Hon.) न्यायमूर्ती रानड्यासारखे विद्वान, किंवा बाटलीवाल्या सारखे श्रीमान नाहीं परंतु आपण अमक्यासारखे असतो तर अमुक केले असतं, असें ह्मणून स्वस्थ बसण्यापेक्षा, जी स्थिती आहे, त्यांतच जें होण्यासारखें आहे तें करणें आपलें कर्तव्य कर्म आहे, असें समजून त्याप्रमाणें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

जे लोक देशहिताचीं मोठमोठीं कामें करीत आहेत, त्यांच्या सारखीं मोठीं कामें, जरी आपल्या हातून झालीं नाहींत, तरी त्यांना होईल तितकी मदत करावी, असें वाटून, प्रो. कर्वे हे विधवागृहासाठीं फंड जमविण्याकरितां चोहोंकडे हिंडत असतात. ते येथेंही एक दोन वर्षांपूर्वीं आले होते, परंतु त्यांना इतक्या लांब येण्याची खटपट पडूं नये, व त्यांचा अमोलिक वेळ इकडे तिकडे जाण्यांत न जातां, याच संबंधानें दुसऱ्या गोष्टी करण्याकडे घालवितां यावा, ह्मणून त्यांना, आपण वऱ्हाडांत येण्याची तसदी घेऊं नका, मी या प्रांतांत विधवा गृहाकरितां गांवोगांव फिरून पैशाची भिक्षा मागेन, व तो पैसा आपल्याकडे पाठवून देईन, असें त्यांना सांगितलें. मी कर्व्यांना झटल्या प्रमाणें भिक्षेची सुरुवात परतवाडा येथें केली. हा गांव लहान असूनही तेथें १२५ रुपये मिळाले. येथें त्याच कामा करितां मी आलो आहे. मला इतर गांवांपेक्षां येथील आशा जास्त आहे. कारण येथें मी पुष्कळ दिवस राहिलेलों आहे. त्यामुळें येथील बरीच मंडळी मला ओळखतात. मी उगीच कोणालाही भीड घालीत नाहीं. विधवा गृहाची हकीकत जाहिरातींतून प्रसिद्ध झालीच आहे. तेव्हा ती वाचून व माझे स्वतःचे त्या संबंधानें विचार ऐकून जर तुह्माला विधवागृहापासून फायदा होईल असें वाटलें, तर तुह्मी शक्त्यनुसार हस्तें परहस्तें मदत करावी, असें सांगून जें मिळेल तें आभारपूर्वक स्वीकारून प्रो० कर्व्यांकडे पाठविण्याचा बेत केला आहे.

याप्रमाणें सदरहू विषयावर त्यांचें व माझे बरेच भाषण झाल्यावर ते घरीं गेले.

वरील गृहस्थ कोण, हें आपल्या सूज्ञ वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेच असेल. कळावें लोभ असावा ही विनंती.

आकोला. आपला "एक"
तारीख १९।२।९८ वर्गणीदार
इसवी.

हे पेनशनर गृहस्थ रा. रा. सदाशिव विष्णु भागवत हे आहेत. हें वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच. गृहस्थ चांगले वक्ते असून त्याचे परिश्रम लोकादरास पात्र होतील अशी आशा आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १५ शके १८१९

बागबगीच्यांची गोडी कांहीं विकत आणितां येत नाहीं. ज्या मनुष्याला नैसर्गीकच ही गोडी असेल तो बागबगीच्यांची खरी किंमत ओळखतो. पण अशा हौसेच्या आनंदकारक गोष्टींत पैशाकडे फारसें लक्ष देतां कामा नये. गेल्या अंकीं आह्मी येथील 'टॅप्स' बगीचा मोडणार असल्या विषयीं कळविलें आणि त्या वेळीं इंडिया सरकार आग्र्याच्या 'आराम बागा'ची विक्री करणार असल्याची दुःखद वार्ता कळविली. लोकांच्या निरसपणाची उदाहरणें पुष्कळ दृष्टीस पडतात. आकोटास मुनसिपल बगीचा फार नामी होता. परंतु तो पट्ट्यानें वहितीला देण्यांत आला आहे. ज्या गृहस्थांनीं आकोटास हा बगीचा केला ते गृहस्थ रा रा देवराव जयकृष्ण एक्स्ट्रा असि. कमिशनर हे आहेत. यांची मनोवृत्तीच अशी उत्तम आहे कीं ते जेथें जातील तेथें आपल्या बागबगीच्याचा व गाड्यांचा महिमा स्थापित करतील. सध्यां तेल्हाऱ्याच्या कचेरींत जो बगीचा आहे तो आमच्या ह्मणण्याची उत्तम साक्ष देईल. आकोटच्या सार्वजनिक बगीच्याची रचना फार मनोहर आहे. ठिकठिकाणीं वेलींच्या कमानी आहेत. पायरस्ता उत्तम काढलेला आहे. पुष्पवृक्ष व वेली पुष्कळ आहेत. परंतु असें रम्य स्थळ तेथील मुनसिपालिटीनें मातीमोल करून टाकलें आहे. मध्यंतरी मि. नुरुद्दीन काजी यांनीं सुस्थितीला बगीचा आणिला होता, परंतु नीरस, द्रव्यदृष्टि व अदूरदर्शी लोकांनीं या बगीच्यास प्रस्तुतचें अमंगल स्वरूप आणिलें आहे. खरोखर ही गोष्ट शोचनीय आहे आणि ती दूर व्हावी एतदर्थ आह्मी प्रत्यक्ष उदाहरणें दिली आहेत. त्यांचा कांहीं उपयोग होईल तर आमच्या लिहिण्याची कृतार्थता होईल. बगीचा मोडून वाचविलेलें धन मुनसिपालिटीस श्रीमान न करितां हीन भाग्याचे ठरवील असा आमचा समज आहे.

---

दामोदर हरी चाफेकर याचा ग्रंथ आटोपला! लेफ्टनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांचे खून केल्या बद्दलची शाबिती सेशन कोर्टात झाली आणि अपीलांत मुंबई हायकोर्टानें तो आरोप कायम केला फाशीची शिक्षा अंमलांत आणण्या विषयीं हायकोर्टानें आपला हुकूम दिला. चाफेकराचा कबूली जबाब साधंत हकीकतीचा म्याजिस्ट्रेट मि. हामिल्टन यांच्या पुढें झाला होता. शस्त्रें, पिस्तुल वगैरे हत्यारें चाफेकरानें दाखवून दिलीं, आणि खुनाच्या गोष्टी खेरीज इतर गोष्टी कबूली जबाबा बरहुकूम पुराव्यानें शाबीत झाल्या आहेत. जुबिलीच्या रात्रीं काळोखांत घडलेल्या खुनाचा तपशील खुनी इसमा खेरीज कोणालाही देतां येणार नाहीं; आणि कबूली जबाबांत कोणीही अकलवान विनाकारण आपल्या धाकट्या बंधूंत गोंवणार नाहीं इत्यादि गोष्टी नामदार न्यायमूर्ती पारसन यांनीं सांगून नंतर कांहीं विशिष्ट मुद्यांचा निकाल सांगितला. आरोपीला कबूली जबाब देतेवेळीं माजिस्ट्रेटचा माजिस्ट्रेटपणा माहित असणें कायद्यानें कांहीं जरूर नाहीं. त्याशिवाय आरोपीच्या ह्मणण्या प्रमाणेंच जर त्यानें पोलीस सुपरिनटेंडंट मि. ब्रवेन यांच्या अभयदानावर विश्वास ठेविला, आणि भावाला पोलिसांत नोकरी, दामोदराच्या नांवानें देऊळ, बायकोला पेनशन, चार पांच वर्षांच्या काळेपाण्याच्या शिक्षेनंतर माफी इत्यादि गोष्टी त्याला खऱ्या वाटल्या तर कबूली जबाबांत खोटा मजकूर सांगण्याची त्याच्या मनाची प्रवृत्ती नसावी आणि कबूली जबाबाचें समर्थन इतर गोष्टीं विषयीं इतर पुराव्याने चांगलें झालें आहे. नामदार हायकोर्टाचा अभिप्राय ध्यानांत धरण्या सारखा आहे; आणि त्यांत दर्शविलेली मनुष्यस्वभावाची गति चिरस्मरणीय आहे. सारांश, दामोदर चाफेकराचा वृत्तान्त कायद्याच्या दरबारांत समाप्तीस पोंचला ! त्यास ता. १८ मार्च रोजीं सकाळीं ६ वाजतां रेमार्केटमध्यें फाशी देण्याचें ठरविलें आहे.

---

ईश्वरी कृपेनें पुण्याच्या दुष्ट खुनांचा पत्ता लागला व खुनी इसम लवकरच देहान्त प्रायश्चित्तानें मनुष्यहत्येचें परिमार्जन करील. आह्मांस आशा आहे कीं ह्या देहान्तशिक्षेबरोबरच पुण्यांत उसळलेली धुमश्चक्री बंद होईल, जादा पोलिसाचा खर्च कमी होईल, आणि सरदार नातूंची बंदीतून मुक्तता होईल. राजश्री बाळ गंगाधर टिळक हें राजनिष्ठ नररत्न मातीमोल होऊं नये ह्मणून मुंबई सरकारापाशी हात जोडून विनंती करितो कीं त्यांस दिलेली शिक्षा माफ करावी. प्रोफेसर म्याक्समुलर साहेबांनीं राजश्री टिळकांस ऋग्वेदाचा नवीन ग्रंथ मुद्दाम पाठविला आहे तो त्यांच्या सुटकेचा शुभ शकुन आह्मी समजतों. सर्वत्र वातावरण अगदीं बिघडलें होतें, पण आतां पिनल कोडांत नवा राजद्रोहाचा कायदा घातला आहे तेव्हां मुंबई सरकारानें दयार्द्रबुद्धीनें राजश्री टिळक यांस स्वगृहीं परत पाठवावें ह्मणजे सर्व महाराष्ट्र त्या सरकारचे धन्यवाद गाईल. सरदार नातूंस खुलें करणें विशेष न्यायाचें होईल. नाहींतर, निदान त्यांस न्यायदरबारांत उभें करून त्यांची योग्य प्रकारें चौकशी होईल अशी योजना तरी झाली पाहिजे.

---

लॉर्ड एलिजन साहेबांचा व्हाइसरॉयपणा या सालांत संपणार आहे. त्यांच्या मागून कोणते लॉर्ड इंडियावर राज्य करण्यास येण्या सारखे आहेत याचा विचार इंग्रजी वर्तमानपत्रातून अलीकडे चालू झाला आहे. लॉर्ड एलजिन यांची कारकीर्द फार नामी झाली ह्मणून लॉर्ड हामिल्टन यांनीं पूर्वीच विलायतेस तुतारी वाजविली आहे. पण आह्मी त्या कीर्तीनादास कांहींच महत्व देत नाहीं. लॉर्ड साहेबांचा स्वभाव चांगला व मितभाषणी आहे. पण त्यांस स्टेट सेक्रेटरींच्या हुकूमा पुढें आपली कर्तबगारी किंवा मुत्सद्दीपणा दाखविण्याचा प्रसंग आला नाहीं. कलकत्याचे स्टेटसमन पत्रकर्ते ह्मणतात कीं नवीन येणारा व्हाइसराय लॉर्ड डलहौसी

सारखा जोमदार, बुद्धिवान, अचाट कल्पना शक्तीचा, व तलवार बहादर असा असावा. त्यावर 'हिंदु' ह्मणतात कीं मध्यम वयाचा अनुभवी व दूरदर्शी असा मुत्सद्दी असावा इतकेंच नाहीं तर त्यांचा कोंडमारा स्टेट सेक्रेटरीच्या हुकूमांनीं न करितां त्यांस विद्यमान स्थितीमानकिडे नजर देऊन राज्यकारभार चालविण्याची पूर्ण मुखत्यारी असावी. 'स्टेट स्मन' कर्ते लिहितात कीं प्रस्तुतचा काळ या देशावर मोठा संकटाचा आला आहे, आणि अशा प्रसंगाला कारणीभूत ईश्वराची इच्छा मानली पाहिजे. खरोखर ईश्वरी इच्छा निराळीच आहे. पण तिला बाधक असा क्षणभंगुर प्रत्यवाय राज्यकर्ते आणीत आहेत. सांप्रतची राजनीतीच मोठी चुकीची आहे. आणि त्या नीतीचे हे पापवृक्ष इंडियांत वाढले आहेत. त्यांस विषारी फळें येण्यापूर्वींच राजनीति बदलली पाहिजे. नवीन व्हाईसरॉय असे पाहिजेत कीं त्यांनीं आपल्या हाताखालील आंग्लो-इंडियन कामदारांचे देव्हारे माजवूं नये, सरहद्दीवर मोठ्या संथपणानें व धैर्यानें शांतता राखावी, इंडियांत स्वस्थता व भरभराटी होऊं द्यावी, आणि चांगल्या राज्यकारभाराचा मूळ पाया आमदानी व व्यय यांची तोंड मिळवणी ती सततची कायम राखली पाहिजे. हल्लींच्या राज्यकारभारांत याच्या उलट प्रकारच्या गोष्टी घडत असून, रेलवेच्या वृद्धीनें ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या भांडवलास चांगली फायद्याची बाब करून देण्यांत आली आहे. ब्रिटिश राज्याच्या सुखासाठीं इंडियाचें अकल्याण झालें तरी हरकत नाहीं. सरहद्दीवरील कलह इंडियासाठींच आहे ह्मणून बेलाशक शेरा ठोकून देण्यांत येतो तेथें न्याय तो कोठून मिळणार!

---

## आकोला म्युनिसिपालिटी व नवीन घरपट्टी वगैरेचे कर.

गेल्या महिन्याचे २९ वे तारखेस वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४१ (१) (अ) प्रमाणे कर बसविण्या संबंधानें पुन्हां पुष्कळ भवती न भवती होऊन अखेर घरपट्टीचा नवीन कर बसविण्याविषयीं ठराव पसार झाला. सदहू करा संबंधानें ज्यांच्या तक्रारी असतील त्यांणीं येऊन आपली कारणें दाखवावी. ह्मणून वर्तमानपत्रद्वारें जाहिराती पूर्वींच प्रसिद्ध झाल्या होत्या. त्याप्रमाणें सुमारे १०२ सह्यांचा अर्ज कमेटीपुढें सादर झाला होता. परंतु ह्या कराविरुद्ध तक्रार कोणीच केली नाहीं. मात्र शेकडा रुपये ७ प्रमाणें बसविण्या विषयीं जो स्पेशल जनरल सभेनें ठराव केला होता तो फार सक्त आहे करितां रुपये ५ प्रमाणें ठराव करण्याविषयीं अर्जदार लोकांनीं विनंती केली होती. परंतु त्याचे पुष्टीकरणार्थ सबळ व सयुक्तिक कारणें कांहींच दाखविण्यांत आली नहींत. तथापि अर्जदार लोकांच्या विनंती विषयीं पुष्कळ वाटाघाट होऊन अखेर शेंकडा रुपये ७ प्रमाणें कर मंजूर करणें कमेटीस भाग झालें. कारण इतका कर बसविल्या शिवाय कमेटीचा खर्च भागण्या इतकें उत्पन्न मुळींच होण्याचा संभव नाहीं. व तसें न केल्यास आणखी एखादा कर बसविणें भाग होऊन लोकांस त्रास होईल, त्यापेक्षां एकच कर मुक्रर करणें कमेटीस योग्य वाटलें. मात्र कर शेंकडा ६ अगर ७ ठेवला जावा या विषयीं बराच वेळ कडाक्याचा वादविवाद झाला. परंतु अखेर बहुमतानें ठराव पसार झाला. ह्या कराची अमलबजावणी झाली ह्मणजे पोलीस पट्टी अजिबात सर्वांवरील रद्द होईल. ह्या घरपट्टीच्या व गाड्या घोड्या वरील कराचा विचार करण्याचें प्रयोजन कीं सरकारी नौकरावरील पोलीस पट्टी या साल पासूनच बंद झाली तेव्हां म्युनिसिपल हद्दींतील रहिवाशांवर कोणता तरी एक सर्व साधारण कर बसविणें जरूरीचें झालें ह्या नवीन कराचें उत्पन्न आंदाजा रुपये ९००० पर्यंत होईल. व गाड्या, घोडे, बैल, कुत्रे, वगैरे वरकड मिळून एकंदर उत्पन्न रुपये ६.०० पर्यंत होईल. व एकूण एकंदर उत्पन्न रुपये १५००० हजार पर्यंत होईल असा अदाजा आहे. व हें उत्पन्न जेमतेम खर्च भागविण्या इतकेंच होईल. तेव्हां घरपट्टी बद्दल शेकडा रुपये ७ प्रमाणें बसविलेला कर कोणत्याही प्रकारें गैरवाजवी व अन्यायाचा नाहीं, हें कोणीही कबूल करील. हा कर घरमालक अगर घरांत राहणारे इसमा पासून वसूल करण्यांत येईल. भाडेकऱ्यांनीं न दिल्यास सदहूचा बोजा घरमालकावर अगर घरावर राहील. मात्र ह्याचा परिणाम घरांचें भाडें घरमालकास वाढविणें भाग पडेल. मात्र या वेळीं आकोलें येथील घरमालकांस आह्मी इतकेंच सुचवितों कीं ज्यांची घरें शिकस्त झालीं असतील त्यांणीं आपलीं घरें चांगलीं दुरुस्त करून विऱ्हाडाच्या सोयी उत्तम केल्यास त्यांसही उत्पन्न होऊन शिवाय राहणारे भाडेकऱ्यांचा त्रास पुष्कळ कमी होईल. गाड्या, घोडे, बैल, रेडे गाढवें व कुत्रे यांजवर बसणारा कर आमचे पत्रांतून २० जानेवारी १८९८ रोजीं जी नोटीस प्रसिद्ध झाली ती प्रमाणेंच कायम करण्यांत आले.

---

### OURSELVES

Our subscribers will, we hope, allow us the usual Holika holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these, no paper will be issued on the 14th current.

The Berar Samachar

MONDAY, MARCH 7, 1898.

The discussion on the Sedition bill is published in the Gazette of India. It is a most valuable record on the law, but its striking feature lies in the abuses that are levelled against the whole lot of the intelligent Natives of India. With them, the so-called revolution begins and threatens to subvert the British Government The Legislative Council was never within our memory a scene of such solid non—sense and rubbish. There should be some restriction as to the extent of condemning the educated Natives of the soil. The Government will do well to reduce the Natives to serfdom pure and simple if they believe even the main doctrines of their official members.

It is most painful to read the speeches of the official members of the Legislative Council. If sedition be possible with the educated classes in India, we present, here, in the very words of Sir A. Mackenzie, a graphic picture of our educated people as seen from the Anglo—Indian points of view. The style is most seditious, vehement and exciting.

"But the majority of the newspapers simply revel in misrepresentation of the motives of the Government and the nature of its measures. And this is an evil which is yearly growing, and with the spread of what is called education, is becoming more far-reaching in its noxious effects. It is, indeed, in my opinion, to our own system of education that we owe all the trouble. I have long been convinced that it is thoroughly unsound. Sir John Strachey, in his *India*, points out that our educational institutions give a more or less good imitation of the purely scholastic part of an ordinary English education; but the young men of India (he says) learn in them almost nothing about their own country, or about the Government under which they live; and least of all are they taught to be good and loyal citizens. We are turning out by scores of thousands, young men who are trained only in words, look mainly for Government employment, and failing to get it, become, as the Maharaja of Travancore described them, "a host of discontented, disobedient, and sometimes troublesome young men." Mr. Cotton, whose leanings towards the educated natives are well known, says: "This accounts mainly for the discontent and restlessness which are perceptible in the rising generation." This is the class that writes for the Native Press, perorates on platforms, and generally vents its spleen upon the Government which has not been able to find appointments for more than a fraction of its members. "We taught them language, and their profit on it is, they know how to curse."

To honest, well-informed criticism no English Government would ever object. But every Government has the right to object when its critics wander off from criticism to calumny. Criticism, it has been said, is but a child compared to calumny; mere bows and arrows to artillery. "No one can well exaggerate the power of calumny or follow out her language and singular ingenuity without mixed feeling of envy and admiration. How clever she is, for instance, says the same writer, "in making use of dull, ignorant, and idle people, using them as the conduits to conduct and the feeders to multiply the remarks and jokes and malice of cleverer people, so that she fertilises the whole ground-work of society with injurious reports, which cannot be well contradicted, about her victims (in this case the Government). Let any transaction be as white as a hound's tooth, she can so admirably discolour it that the original whiteness can never be restored." Calumny begins, as Beaumarchais graphically describes it, with a gentle breath, but gathering as it grows becomes at last a general outcry, a public rescendo, a universal chorus of hate and denunciation. Practically, as applied to the Government and its measures, this is the sort of thing that has been growing more and more marked during the past twenty years, save that we now find the hostile denunciation in full cry, the whispering of sedition and calumny having been discarded as not strong enough for the vitiated taste of the newspaper writers and readers."

It is very difficult to take in th[e] doze of utter unwisdom and we pr[...] that the Council—halls should nev[er] be the platforms of such denunciation[s].

---

सुटी— या आठवड्यांत होलिकापूजन व रंगपंचमीचा मोठा सण आहे. आणि त्या निमित्त मामूल वहिवाटी प्रमाणें तारीख १[४] मार्चचा वऱ्हाडसमाचारचा अंक निघणा[र] नाहीं. आमचे वाचक ही सुटी आनंदा[नें] मान्य करतील.

---

## वऱ्हाड

हवामान—आरंभीं दोन तीन दिवस चां[ग]ला उन्हाळा भासूं लागला होता. पण पुन्हा हवेंत चलबिचल होऊन गारठा विशेष प[ड]ला, वारा अंगाला झोंबूं लागला, व हव[ा] मोठी रोगट वाटूं लागली. परंतु काल परव[ा] पासून हवामान चांगल्या प्रकारें बदलत चाल[ले]लें आहे. पाण्याचा बोभाटा पुष्कळ ठिकाण[ीं]चा ऐकूं येतो. रोगराई ह्मणण्या सारखी को[ठें] कोणतीच नाहीं.

क्या० कोलब साहेब डिपुटी कमिशन[र] बुलढाणा हे १ ले एप्रिल पासून २ वर्षांच्या फर्लो रजेवर जाणार असून त्यांच्या रजें[त] मि० गाडविन आस्टीन साहेब काम पाहतील.

रा० रा० जी. सुब्रायलू नायडू तहशिलदार वर्ग १ आफिशिएटिंग ए० असि० क[]मिशनर वर्ग ५ यास के० कृष्णराव हरी कोलटकर यांची रिकामी असलेली कायम[ची] ए० असि० कमिशनरी देण्यांत आली हें क[]ळविण्यास मोठा आनंद वाटतो.

गेल्या आठवड्यांत खालील मुनिसिपालिटीं सभासदांच्या निवडणूकी होऊन जे सभासद निवडण्यांत आले त्यांची नांवे येणें प्रमाणें:—

अकोलें.

रा. रा. गणोबा राघोबा.

रा. रा. नारायण काशिनाथ दाते, बी. [ए.]

रा. रा जयकृष्ण बगाजी.

मि. मौलवी हकीमुद्दीन.

रा. रा. रामचंद्र मार्तंड गुप्ते.

खामगांव

रा. रा. केशव घनश्याम, रामनाराय[ण] बिसनदयाल, आबाराव जानराव.

शेगांव

रा. रा. मथुरादास राऊतमल, श्रीकिस[न] बिजराज, भिवराज गणेशदास.

या तीन मुनसिपालिट्यांपैकीं अकोल[ा] मुनसिपालीटीच्या सभासदपणासाठीं उमेदवा[र] वार्डोवार्डांच्या रिकाम्या जागांपेक्षा जास्त नसून कमी असल्यामुळें निवडणूक करण्या[]ची गरज राहिली नाहीं ही गोष्ट फार वा[ई]ट होय.

---

ता. ४ मार्चची रूटरची तार क[ळ]विते कीं स्टेट सेक्रेटरी लार्ड हॅ[मि]ल्टन साहेबांनीं पार्लमेन्टचे प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें कीं नातू बंधूनां सोडल्या पासून शांततेचा भंग होण्याचें भय ना[हीं] असें व्हाईसराय साहेबांस व मुंबईचे [ग]व्हरनर साहेबांस वाटेपर्यंत त्यांस [अट]केंत ठेविलें जाईल !

---

## वर्तमानसार

चालू ( १८९८ ) साल आपल्याला फार भयंकर जाणार असें गेल्या मकरसंक्रमणाचे फलावरून दिसत असून, त्याचे समर्थनास आणखी कित्येक गोष्टी ऐकण्यांत येत आहेत त्यांवरून कोणाचेंही अंतःकरण भविष्यकाळाविषयीं सभय होणें साहजिक आहे. युरोपांत फलज्योतिषाचे ठोकताळे दाखविणारे प्रसिद्ध ज्योतिर्विद झडकील यांचें भविष्य चालू वर्ष हिंदुस्थानाला अनिष्टच अनुभवास येण्याबद्दल प्रसिद्ध झालें आहे त्याचप्रमाणें झडकील सारखेच ठोकताळ्याचे आमचे इकडील फलज्योतिषी कलकत्तावासी बाबु पंडित तारिणीप्रसाद यांजकडूनही ह्या वर्षीचें अनिष्ट फलच वर्तविण्यांत आलें आहे. शिवाय ह्या वर्षांत पुढें पांच धूमकेतु उदय पावणार आहेत; त्यांच्या उदयानें तर ह्या वर्षाची अनिष्टता विशेषच स्पष्ट व दृढ होत आहे. हीं पांच शेंडेनक्षत्रें पुढें लिहिल्याप्रमाणें निरनिराळ्या वेळीं उदय पावणार आहेत. हे पांच धूमकेतु इंग्रजी ज्योतिषानीं दिलेल्या निरनिराळ्या नांवाचे आहेत. पहिला, 'पॉट्स बुइनूनेक' हा येत्या एप्रील महिन्यांत उदय पावणार णाहे. दुसरा, 'एन्क' हा मे मध्यें दृष्टीस पडेल; 'स्विफ्ट आणि बुर्क यांचे धूमकेतू' ह्या नांवांचीं दोन शेंडेनक्षत्रें अनुक्रमें जून व सप्टेंबर मध्यें दिसणार आहेत. आणि पांचवें शेंडेनक्षत्र "टॅपल्सकॉमेट" हें नोवेंबर मध्यें दिसणार आहे. 'बीलास कॉमेट' नांवाच्या एका धूमकेतूच्या प्रभावानें नोवेंबर महिन्याच्या २६ वे व २७ वे तारखेस अतिशय नक्षत्रपात होणार आहे. ह्या उल्कावृष्टीनें तर वरील पांचही धूमकेतूस मागे सारणारा भयंकर देखावा लोकांचे दृष्टीस पडणार आहे. कांहीं वर्षांखालीं एका नोवेंबर महिन्याच्या २६ वे तारखेस असाच विलक्षण नक्षत्रवर्षाव झाला होता. ही गोष्ट विचक्षण लोकांच्या स्मरणांतून गेली नसेल असें वाटते. मात्र त्या वेळचें अनिष्ट फल ह्या वर्षी वर्तविलें आहे अशा प्रकारचे कांहीं अनुभवास आलें नाहीं असो. पुढें काय काय घडतें तें प्रस्तुतसारख्या अत्यंत क्षणभंगुर अवस्थेंतून जगून वांचून जे जीवंत राहतील त्यांच्या दृष्टीस पडेल हें उघड आहे. तेव्हां त्याबद्दल सध्यां कांहीं एक बोलता येत नाहीं. तरी हीं सर्व भविष्यें सर्व आबालवृद्धांनीं व आडाणी काबाडी यानीं खरीं मानलीं असतां त्यांस लक्ष गोदानाचें पुण्य लागेल व जे तीं खरीं मानणार नाहींत त्यांस लक्ष गोहत्येचें पाप लागेल, अशा प्रकारचे गेले महिन्यांतील वर्तविलेल्या काशीच्या बदमाष भविष्यवाद्या प्रमाणें शपथविधि राखण्यांत येत नाहीं. फक्त लोकांनीं काय अनुभव येतो तो पहावा, येवढीच सूचना आहे.

क० त०

[...]यव्य प्रांतांतील बरेली येथें एका मुसलमान गृहस्थानें अमृतबझार पत्रिकेस कळविलें आहे त्यावरून कळतें कीं, एकी हीच शक्ति हे उभय जातीच्या पुढारी लोकांस या प्लेग नियमांनीं शिकविलें, व उभयतांनीं मिळून एक विचारानें कोणतीही गोष्ट करावयाची असें ठरलें तेव्हां एका बड्या अधिकाऱ्यानें फाटाफूट करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उभय जातीमधील पूर्वीचा दुजाभाव अगदीं गेला असून हिंदुलोकांचे श्रीकालीदेवीचे उत्साहांत मुसलमान लोक प्रेमानें नाचतात खेळतात व मोहारमांत मुसलमानांबरोबर हिंदुलोक खुशाल हैदोस घालतात, इतकें प्रेमबंधन दृढ झालें आहे.

हा प्रकार बरेलीचा झाला. पाटणा येथील लोक जरा याहून पुढें गेलेले दिसतात. व आपसांतील यादवीचे दुष्ट परिणाम कसे भोगावे लागतात त्याचा प्रकाश तेथील मुसलमान व हिंदू या उभयतांचे अंतःकरणावर चांगलाच पडल्याचें चिन्ह दिसत आहे. त्या शहरांत प्लेग निवारणाचे उपाय सुरू झाले तेव्हां हिंदु मुसलमानांच्या बायकांस तपासून इस्पितळांत नेणार अशी जिकडे तिकडे बातमी पसरल्याबरोबर तेथील उभय जातींतील पुढारी एकत्र जमून त्यांनीं ठरविलें कीं, आजपर्यंत उभयतांच्या मनांत जें कांहीं किल्मिश असेल तें साफ काढून टाकावयाचें व द्वेषभाव अगदीं विसरून जाऊन एक विचारानें प्लेग तापाचें संकट निवारण करावयाचें एवढा नुसता ठरावच करून ते राहिले नाहींत तर एकमेकांनीं एकमेकांवर दिवाणी फौजदारीच्या केलेल्या फिर्यादी काढून घेतल्या व कायद्याप्रमाणें ज्या फिर्यादीचा निकाल आपसांत होण्यासारखा नव्हता त्यांच्या नेमलेल्या तारखेच्या दिवशीं फिर्यादीनें कोर्टांत गैरहजर राहून खटला काढून टाकण्यास कोर्टास भाग पाडावें असें ठरलें, व तसें झाल्यामुळें कोर्टास व वकिलांस कामें मिळत नाहींशीं झालीं आहेत. ही सर्व हकीकत प्रत्येक हिंदुमुसलमानानें विचार करण्या सारखी व अनुकरण करण्यासारखी आहे. एकी हीच शक्ति हें तत्व हिंदुस्थानांतील हिंदुमुसलमानां मध्यें जस जसें बाणत जाईल, तसतसा हिंदुस्थानाचा भाग्योदय लवकर लवकर होत जाईल यांत काडीमात्र संशय नाहीं.

शु० सू०

तापतीव्हाली रेलवेचें काम बऱ्याच जोरानें चालू आहे असें समजतें. ४५ साव्या मैलापर्यंतच मातीचें काम पुरें झालें तसें पुढें ५० मैलपर्यंत आणि ७० पासून ९५ मैलांपर्यंत या दोन तुकड्यांतलें भरावाचें कामही झपाट्यानें करण्यांत येत आहे. वार्टेत गंगाधर नांवाचा जो एक मोठा पूल आहे तो बहुधा या महिन्याच्या अखेरीस पुरा होईल तो झाल्यावर ४५ मैलापर्यंतचें पुलाचें कामही बहुतेक आटोपल्यासारखें होईल चाथम आणि बार्डोली येथें स्टेशन वगैरेचीं तयारी आहे. आणि वाडी, व्यारा व नंदुरबार येथील तयारी चालू आहे. बार्डोला पर्यंतचा रस्ता तयार झाला असून तेथपर्यंत मालाच्या गाड्याची रहदारी बहुधा येत्या महिन्यापासूनच सुरू होईल असें दिसतें.

ठा. अ.

आजमितीला जगांत दोन लक्ष पोष्टमास्तरांची संख्या असल्याचें समजतें.

रेल्वेच्या एका एंजीनास लोखंडाचे ६ हजार तुकडे जोडलेले असतात.

महाराणीसाहेबांच्या मुख्य बवर्चीला ११२०० रुपये सालीना पगार मिळतो.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड पुन्हां जपान व अमेरिकेकडे प्रवासास जाणार असल्याचें कळतें.

घडी करितां येईल असें एक नवीन जातीचें बायसिकल एकानें तयार केलें आहे.

कोल्हापूर येथील वरीष्ठ न्यायाधिश आणि महाराजांच्या कौन्सिलचे मेंबर रा० ब० बळवंत नारायण जोशी हे मरण पावले. आहेत.

यंदां बंगाल, मद्रास व दक्षिण या तीन प्रांतांत मिळून २८० लक्ष टन धान्य उत्पन्न होईल असें सरकारी अंदाजपत्रक ह्मणतें. खरें ठरेल तेव्हां.

निजाम हैद्राबाद येथील न्याय खात्याकडील प्रधान नबाब फखरुलमुल्क व तेथील सिटि माजिस्ट्रेट मि. सय्यद हसन यांजबद्दल बरीच ओरड झाली आहे. मजकूर प्रधानानें मद्रास येथील एका असामीपासून जरूरी कर्ज घेऊन त्याला ८ हजारांचें कमिशन देण्याचें कबूल केलें. कांहीं दिवशीं त्याला ५ हजार रुपये दिले व बाकीची रक्कम आदा करण्यापूर्वी आणखी ८ हजारांची रक्कम त्याच असामी कडून प्रधानाच्या नांवानें सय्यद हसन यानें आणली. परंतु त्या पैकीं एकही कवडी न दिली गेल्यामुळें असामीनें मद्रास हायकोर्टांत फिर्याद मांडून ११ हजारांची डिक्री करून घेतली. मद्रास हायकोर्टानें सय्यद हसन याच्या भलेपणाबद्दल चांगलीच संभावना केली. सदर इसम प्रधानाचा खासगी सेक्रेटरी व हैद्राबादचा सिटी माजिस्ट्रेट आहे. त्याच्या वर्तनासंबंधानें जी टीका झाली त्यावरून अशा माणसाला सिटी माजिस्ट्रेट सारख्या बड्या हुद्याच्या जागेवर ठेवणें रास्त आहे किंवा नाहीं अशाबद्दल वरिष्ठ अदालतीकडून तेथील जज्यांना विचारणा केली होती त्याचे जबाबांत हैद्राबाद हायकोर्टातर्फे ज. मि. अफसुल हुसेन यांनीं असें उत्तर दिलें कीं; ब्रिटिश कोर्टांत निकालास लागलेला मोकद्दमा व ब्रिटिश जज्जानें दिलेला अभिप्राय मोंगलाई हद्दींत चालवितां येत नाहीं, आणि ह्मणून वरील बाबतीसंबंधानें आपल्यास कोणत्याही प्रकारचें कर्तव्य करण्याची जरूर नाहीं; आणि ह्या उत्तरान्वयें सदर माजिस्ट्रेटाला त्याच्या जागीं आहे तसाच कायम ठेवण्यांत आला आहे. शाबासरे मोंगलाई कारकीर्द! या गोष्टीवरून मोंगलाईतील बड्या बड्या अंमलदारानाच काय पण खुद्द निजामसरकारलाही ब्रिटिश हद्दींतून कपर्दिकही कर्ज मिळेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. कारण, मोंगलाईतील अंमलदार ह्मणजे अगदीं शहाजोग कूळें असल्याचें मद्रास हायकोर्टाच्या बाहेर आलेल्या ठरावावरूनच सिद्ध होऊन चुकलें आहे.

गुराखी.

आस्ट्रेलियांतील सर्व शाळांमध्यें बुद्धिबळांचा खेळ हा एक स्वतंत्र विषय ह्मणून शिकविला जातो.

एक नवीन चंद्र!— हल्लीं जो आपल्याला चंद्र दिसत आहे असाच दुसरा एक चंद्र ता० ३० जुलै १८९८ रोजी स्पष्ट दिसेल असें हंबर्ग येथील एका ज्योतिष्यानें वर्तविलें असल्याची बातमी प्यारिसच्या कित्येक पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. परंतु तें भविष्य सर्वांशी मिथ्या आहे, असें फ्रेंच ज्योतिष्यांचें मत प्रसिद्ध झालें आहे. तिकडेही आमच्या बनारसी व मुलतानी ज्योतिष्यांचे भाईबंद आहेत असें दिसतें!

गोंदलेलें मृत्युपत्र.—मेक्सिको ( दक्षिण अमेरिका ) देशांत नुक्ताच एक श्रीमंत परंतु अति कृपण मनुष्य मरण पावला. तेव्हां त्याचे वारसदारांनीं सरकारी अधिकाऱ्यांकडे अर्ज केला कीं मयत गृहस्थ मोठा श्रीमान् असून, त्याची जिंदगी फार मोठी आहे. पण तो अतिशय कृपण असून, कागद व शाई यांचाही खर्च नको ह्मणून त्यानें आपलें मृत्युपत्र वेगळें लिहून न ठेवतां आपल्या अंगावर गोंदून त्यांत आपले पश्चात आपल्या जिंदगीची काय व्यवस्था करावयाची असेल ती व्यवस्था लिहून ठेविली आहे। त्या व्यवस्था पत्राची सरकारांत नक्कल करून घेऊन नंतर त्याचे प्रेताला मुठमाती देण्याचा हुकूम व्हावा. हा अर्ज तेथील अधिकाऱ्यांनीं पाहून लगेच त्या प्रेताला उघडें करून त्याची तपासणी करण्याचा हुकूम दिला व त्याप्रमाणें त्या श्रीमान् कृपण मनुष्याचें प्रेत उघडें करून तपासण्यांत आलें. तों त्या कृपणानें तांबड्या रंगानें आपल्या छातीवर आपलें व्यवस्थापत्र गोंदून ठेवलेलें होतें असें आढळलें. त्याची प्रत उतरून त्या प्रतीवर पंचांच्या व अधिकाऱ्यांच्या सह्या घेऊन तें व्यवस्थापत्र सरकारी दप्तरांत दाखल करून नंतर त्या प्रेतास मुठमाती देण्याचा हुकूम झाला. यापणाणें ही एक विलक्षण मृत्युपत्राची आणि कमालीच्या कृपणपणाची अगदीं ताजी हकीकत आहे.

ज्ञा. प्र.

---

नोटीस.

रा० रा० कर्णाजी वल्लद जयराम नेमाने व गणू वल्लद सखाराम उभयता राहणार शिर्ले ( नेमान्याचें ) तालुके बाळापूर —

यांस.

तुह्मी आमच्याकडून भाडेपट्ट्यानें खालील शेतें व दोन घरें ता. १६-५-९४ रोजीं ४ वर्षांच्या करारानें घेतलीं.:—

मौजे शिर्लें येथील.

| सर्व्हे नंबर. | हिस्सा. |
|---|---|
| १ | १/४ |
| ६७ | सालीम |
| ९० | सालीम |
| १६५ | २/३ |
| १६६ | सालीम. |

हीं पांच शेतें आणि दोन रहाण्याचीं घरें या पैकीं घरांची चार वर्षांची मुदत भरण्याची आहे पण पांचही शेतांचा उपभोग ४ वर्षें घेतला आणि भाडेपट्ट्याच्या करारा प्रमाणें चार पिकें झाल्यामुळें सदर्हू शेतें तुह्मी आमच्या ताब्यांत दिलीं पाहिजेत.

सदर्हू पांच शेतें तुमच्याकडे वहितीला यापुढें आह्मास ठेवावयाचीं नाहींत. हीं शेतें तुह्मी तारीख १५ मार्च १८९८ रोजीं आमच्या ताब्यांत द्यावीं.

त्या तारखेस शेतें ताब्यांत न मिळाल्यास तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून कोर्ट खर्च वगैरे इतर खर्चासहित कोर्ट मार्फत शेतें ताब्यांत घेतलीं जातील. कळावें. तारीख २६-२-९८ इसवी.

सही
आईदांन सांगीदास साहु
दस्तुर खुद्द.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... .......८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy ...................................4a

Advertisemen
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 a

VOL XXXII — AKOLA MONDAY 21 MARCH 1898 — NO 11

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख २१ माहे. मार्च सन १८९८ इ० — अंक ११

## नोटीस

नोटीस देशमी जानी मर्द रामजी वाघमारे राहणार मौजे सोगोड तालुके जळगांव जिल्हे आकोला यास खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं आमची सून नामे जनी ही तुमची मुलगी असून गेल्या पाच वर्षा पासून तुमचे घरीं आहे. आह्मी दोन चार वेळां नेण्याकरिता आलो असतां तुह्मी पाठविली नाहीं त्याचें कारण असें कीं आह्मी लग्नांत तिचे आंगावर सोन्याचे डागिने ( गळसरी तोळे पांच व पाटल्या दोन सहा तोळ्याच्या असे एकूण तोळे ११ अकरा ) याची किंमत अजमास रुपये २७५ दानशे पंचाहातरचे व पितांबर रुपये ९० नवदचा असे घातले होते ते तुह्मी आह्मासही न देता मुलीचेही आंगावर दिले नाहींत सबब तुह्मी मुलगीही पाठविली नाहीं हल्लीं त्या मुलीस तारुण्यदशा प्राप्त होण्यास ही तीन वर्षे झाली या करिता ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे घरी डागिन्यासह वर्तमान आमचे सुनेस आणून घालवे. जरी आह्मी आमचे मुलास गंधर्वाची दुसरी बायको करून दिली आहे तरी तुह्मी आमचे सुनेला ( जनी ) इजला डागीन्या सुद्धा आणून घातले असतां आह्मी तिचे चांगले प्रकारें पालन पोषण करूं. असे तुह्मी न केल्यास कोर्ट मार्फत व्यवस्था करावी लागेल तेणें करून कोर्टखर्च तुह्मावर बसेल. मुलीच्या अवस्थासंबंधानें आह्मी जबाबदार नाहीं कारण वयात मुलगी आल्यावर आईबापानीं आपल्या घरी ठेवणें चांगले नाहीं. कळावे तारीख ९ माहे मार्च सन १८९८ इसवी.

सही

पांडु वल्लद देवाजी फुलकर राहुणार वावनबीर तालुके जलगां व दस्तूर खुद

## नोटीस

रा. मुर्लीधर आत्म्याराम राहणार पातोला तालुके जळगांव जिल्हा आकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे मंगनीराम आत्माराम या नावाचे अडगांव येथील दुकानाकडे आमची रकम घेणें आहे. ती रकम व्याजासुद्धां ही नोटीस पोहोचल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत आणून देऊन पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास रीति प्रमाणें फिर्याद करून अर्जीसुद्धां सर्व रकम तुमचे पासून भरून घेऊ हे तुह्मांस कळावे. तारीख ७ माहे मार्च सन १८९८ इसवी.

सही

श्रीराम शालीग्राम दुकान खामगांव मालक फतेलाल शालीग्राम तर्फे एजंट् नारायण त्रिंबक गोखले दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा. तनसूकराय घनःशामदास राहणार दानापूर तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून कळविले जाते कीं मित्ती कार्तिक शुद्ध १ संवत १९५२ रोजीं १३५२ ॥-॥। तुमचे कडे घेणें व्याजबद्दल तुह्मी रुजू करून देऊन वसूल आलेली रकम वजा जाता कटमितीचे व्याजा सुद्धां आज रोजी तुमचे कडे घेणें १९११॥-॥। घेणें असून त्याचा उलगडा तुह्मी केला नाहीं यास्तव या नोटीसीनें कळविले जाते कीं सदर्हू रुपये ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांनीं नोटीशीचे खर्चा सुद्धा तेल्हारे येथें आमचे दुकानावर पाठवावे सदर्हू मुदतींत रुपये न पाठविल्यास फिर्याद करून खर्चा सुद्धा रुपये भरून घेतले जातील कळावे तारीख १२ मार्च सन १८९८ इसवी.

सही

मंगणीराम तनसूकराय दुकान तेल्हारे तर्फे मुनीम हिरानंद मनीराम दस्तुर खुद्द.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, आणि स्टेशन धर्मशाळेचा कर वसूल करण्याचा, सन १८९८।९९ सालचे हक्कांचा लिलाव तारीख २५ माहे मार्च सन १८९८ इ० रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें. ता० ४ माहे मार्च सन १८९८ इ०

K. G. Damle
सेक्रेटरी
म्यु. क. अकोलें.

वऱ्हाडसमाचार

मित्ती फाल्गुन वद्य १४ शके १८१९

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजा'चा १२ वा वार्षिक समारंभ पूर्व संकेता प्रमाणें दर्यापुरास झाला. ता. ६ व ७ मार्च या दोन दिवशीं हा समाज भरला होता. दर्यापुर हा गांव रेलवेपासून ७।८ कोस लांब आहे तथापि मंडळी पुष्कळ जमली होती ही विशेष आनंदाची गोष्ट होय. एकंदर सुमारें ३०० गृहस्थांचा हा मेळा भरला होता. एवढ्या मोठ्या समूहाची व्यवस्था फार नामी ठेवण्यांत आली होती. सर्व बातबेत राजेशाही थाटाचा होता. दर्यापुरा सारख्या लहान गांवीं इतका चांगला उत्सवसमारंभ होईल अशी आह्मास कल्पनाही नव्हती. मूर्तिजापूर स्टेशनावर उतरल्या पासून सर्व आदरसत्काराच्या व पाहुणचाराच्या योजना मोठ्या वर्णनीय होत्या. १००।१५० वेगवान बैलगाड्या स्टेशनावर तयार होत्या. इतकी पुष्कळ मंडळी आपापल्या गाड्या एका मागून एक काढूं लागली तेव्हांची शोभा फार आल्हादकारक वाटली. उतरण्याच्या जागा लायब्ररी, क्लब, धर्मशाळा इत्यादि इमारतींतून केल्या होत्या. सभेच्या कामासाठीं एक सुंदर मंडप नाटकगृहाच्या रचनेवर तयार केला होता. भोजनसमारंभाची योजना नवीन तयार होत असलेल्या राममंदिरांत केली होती. हें राममंदिर दर्यापूरचे प्रसिद्ध गृहस्थ रा. रा. रामकृष्ण गणोगकार यांनीं बांधलें आहे. सर्व इमारत मोठी भव्य, पवित्र रमणीय व अशी होत आहे. सर्व काम पुरें झाल्यावर लवकरच मूर्तिस्थापनेचा समारंभ होईल. हें मंदिर अशा सुमुहूर्तावर बांधण्यांत येत आहे कीं मोठमोठ्या मेजवान्यांचे समारंभ त्या रम्य स्थळीं प्रारंभापासूनच घडून येऊं लागले. राजश्री रामकृष्ण नाईक यांच्या मनमिळाऊ व प्रेमादराच्या स्वभावामुळें असा सुयोग दृष्टीस पडला. सेक्रेटरी रा. गोविंद कृष्ण पर्वते बी. ए. एल. एल. बी. व गंगाधरपंत जगदळे यांनीं मोठे परिश्रम घेतले. कांहीं गृहस्थ स्वभावतः स्नेहाचे व प्रेमाचे भुकेले असतात. अशा उत्तम प्रकृतीच्या माणसांकडून समाजासारख्या मेळ्याला मोठी जंगी मदत झाली. दर्यापूरचे लोकमान्य गृहस्थ रा. रा. भगवंत शंकर देशमुख, नारायणराव मुनशी आदिकरून मंडळी समाजाच्या कामीं फार उपयोगी पडली. त्यांच्या प्रेमपुरस्सर वर्तनक्रम पाहून सर्वजण अत्यंत आनंदित झाले व सर्वांनीं त्यांचे मनोभावें आभार मानले. त्याशिवाय समाजाचे सभासद रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए.; वासुदेव विठ्ठल चांदेकर, रघुवीरसिंह दुनियासिंह इत्यादिकांनीं देखील त्यांच्या चाकरीच्या गांवींच समाज भरल्यामुळें समाजाला येण्याची टाळाटाळ केली नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यांनीं उत्साहबुद्धीनें व मनोभावानें समाजाची यथासांगता मोठी आल्हादकारक केली. दर्यापूर गांव लहान पण टुमदार व स्वच्छ आहे. तेथील चंद्रभागा नदीचें वाळवंट खों खों खेळतांना मंडळीस फार नामी वाटलें. मोठमोठे समाज व्यवस्थितपणानें भरविण्याची कर्तृत्वशक्ति दर्यापुरा सारख्या लहान गांवच्या मंडळीमध्यें आली आहे ही गोष्ट १९ व्या शतकाच्या अखेरीला ब्रिटिश राज्यकारभाराला मोठी भूषणास्पद होय.

गेल्या ६ वे तारखेस सकाळीं प्रारंभीं रा. रा. गोविंद कृष्ण पर्वते यांनीं जमलेल्या मंडळीचें स्वागत प्रेमोद्गारांनीं व लोकाचाराच्या चार शद्बांनीं केल्यावर रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली. त्यांच्या संभाषणांत समाजाच्या उत्कर्षाचें वर्णन झाल्या नंतर आवाभावानें त्यांनीं जुन्यानव्या विचारांची अद्वैतता प्रतिपादित केली. व्याख्यान उत्तम झालें आणि तें उपयुक्त असल्या वरून आह्मी तें साग्रतेनें प्रसिद्ध करण्याच्या विचारांत आहों. आपल्या जुन्या धर्मांचे वेदान्तपर सिद्धान्त आणि नवीन उत्क्रांती, वासनादार्ढ्य प्राणवाद इत्यादि शास्त्रीय सिद्धान्त यांची ऐक्यता दाखविण्याचा प्रयत्न राजश्री खापर्डे यांनीं फार शोधकपणानें केला आहे. त्यांचें वक्तृत्व, भाषासौष्ठव व विषयप्रतिपादन हीं श्रोतृमंडळीस फार आवडलीं. नंतर रा० रा० बळीरामपंत पिंपळे यांनीं मागील सालचा रिपोर्ट वाचला आणि सभा तहकूब झाली. दोन प्रहरीं भोजनसमारंभ उत्तम झाल्यावर गायन, खेळ, वगैरे गोष्टींत पहिला दिवस संपला. संध्याकाळीं रा० रा० सदाशिव विष्णु भागवत यांनीं स्त्रीशिक्षणावर थोडक्यात संभाषण करून प्रोफेसर कर्व्यांच्या पुण्याच्या विधवागृहास मदत करण्याविषयीं विनंती केली. त्या नंतर मंडळी वाळवंटांत कुशलप्रश्नाच्या गप्पा मारीत असतांना रा० रा० लक्ष्मण सखाराम मिर्गे यांनीं अजिंठ्याच्या लेण्याचें वर्णन इतकें उत्तम केलें कीं या डोंगरांतील लेण्यावरील चित्रलेखन प्रत्यक्ष पाहण्याचा संकल्प पुष्कळांनीं पक्का केला. हे गृहस्थ चित्रकलेंत कुशल व निपूण असून स्वभावानें अगदीं साधे आहेत. म्याट्रीक्युलेशन पर्यंत शिकल्या नंतर यांनीं मुंबईच्या 'आर्टस' शाळेंत अभ्यास केला आहे. त्यांच्या या नूतन उद्योगांत त्यांस चांगलें यश येईल अशी आह्मास उमेद आहे.

तारीख ७ रोजीं सकाळीं सभा पुन्हा भरली तेव्हां समाजाच्या नियमा[illegible]धानें वाटाघाट होऊन त्यांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. कायमच्या नियमांचा मसूदा सर्व मंडळींत वाटण्यांत आला आणि ज्या कांहीं सूचना कोणास करावयाच्या असतील त्या त्यांनीं या कमेटीकडे पाठवाव्या असें ठरलें. कमिटींत खालील गृहस्थ नेमण्यात आले:— रा० रा० मोरो विश्वनाथ जोशी, मल्हारराव ढिकरकर, व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर, रामचंद्र विष्णु

हाजरी, केशव गोविंद दामले, बाळकृष्ण रेश्वर साठे, गणेश नागेश सहस्रबुद्धे, श्रीराम राघव नस्तीकर, श्रीधर रंगनाथ विकर, व व्यंकटेश बाळकृष्ण देशपांडे टील सालीं ही कमिटी नियमांचा मसूदा पुढें ठेवील. समाजाच्या सभासदांची यरेक्टरी तयार करण्याविषयीं राजश्री दिकर यांनीं सूचना केली आणि तिचें म रा० रा० दत्तोपंत गोखले यांनीं मोठ्या तत्परतेनें आपल्याकडे घेतलें आहे. सर्व शिक्षक जनरल सेक्रेटरीकडे पाठविण्या संबंधानें सर्वांचा एक विचार झाला आणि वकिलीच्या नियमा संबंधानें थोडा वाद होऊन नंतर पुढील सालचा समाज आकोल्यास किंवा प्रसंग विशेषीं बाळापुरास भरविण्याचा संकल्प होऊन खालील अधिकारी मण्यात आले:—

रा० रा०

केशव गोविंद दामले. } जनरल सेक्रेटरी.
बळीराम मेघश्याम पिंपळे

रामचंद्र मार्तंड गुप्त. } १३ वे समारंभाचे सेक्रेटरी.
रामचंद्र विष्णु महाजनी.

सायंकाळीं रा० रा० व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं सत्यंतचित्-परब्रह्म अशा आशयाच्या विषयावर कीर्तन केलें. राजश्री देसाई यांची मनोवृत्ती ईश्वरपरायण झाली असल्यामुळें त्यांनीं आपल्या नव्या अनुभवाचा प्रसाद कीर्तनद्वारा आपल्या स्नेही मंडळीस दिला. कीर्तन चांगलें झालें आणि नव्या हरिदासाची सर्वांनीं मोठी वाहवा केली.

---

या समाजाचे कांहीं उमरावतीकर सभासद चांगले गुणी आहेत. त्यांस नाट्यकलेची मोठी गोडी आहे. त्यांनीं पुष्कळ परिश्रम केले आणि समाजा साठीं दोन प्रयोग करून दाखविले पहिला प्रयोग 'गुणोत्कर्षा' चा असून 'नवरदेवाची जोडगोळी' या प्रहसनाचा दुसरा प्रयोग होता. दोन्हीं प्रयोग फार नामी झाले या नाटकांची तालीम रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं दिली होती

रा. रा. मोरो भिकाजी अगाशे, वामनराव पुरोहित, नारायणराव पेंडसे, भास्कर वामन जोशी इत्यादि गृहस्थांनीं आपापल्या भूमिकेचें काम उत्तम केलें निरनिराळ्या पात्राचे अभिनय फार स्वाभाविक दिसत असून मनोहर होते. ही नाटकाची करमणूक मोठ्या खर्चाची असल्यामुळें तिला समाजानें फांटा दिला तथापि नाटकाला तिकिटें लाऊन उमरावतीकर मंडळी खर्चाची बाब परभारें भागवितात आणि आपल्या इष्टमित्रांचे समाराधन मोठ्या हौसेनें व स्वल्प पैशांत करितात. अशा मनोरंजनाच्या योजने बद्दल उमरावतीकर मित्रांचे आभार समाजानें मानावे तितके थोडेच आहेत. स्त्रियांची भूमिका घेण्याला तरुण विद्यार्थी मिळविण्याची दरसाल मोठी मारामार पडत असे परंतु यंदा ती नड कांहीं उल्हासी विद्यार्थ्यांनीं उत्तम प्रकारें दूर केली. चार पांच नायकांचीं सोंगें एकदम रंगभूमीवर आलीं तेव्हां सर्व प्रेक्षक चकित झाले. आमचे उमरावतीकर मित्र नाट्यकलेचे कट्टे भक्त दिसतात. हा करमणुकीचा उपकार समाजाच्या कार्यमालेला देखील बाधक होतो परंतु नाटका इतकी मोहक व सर्वंकष करमणूक अन्य कोणतीच होणार नाहीं. नाटकाचा व्यासंग असाच कांहीं वर्षे चालेल तर सार्वजनिक संस्थांस द्रव्याची मदत करण्याची उत्तम गुरुकिल्ली उमरावतीकर मित्र मंडळीच्या हातीं येईल. दरसाल नाटकाच्या उत्पन्नांतून खर्च वजा जातां राहिलेली शिल्लक सार्वजनिक कार्यांकडे खर्च होत असते. ही परोपकाराची गोष्ट आमच्या उमरावतीकर गृहस्थांस मोठी भूषणास्पद होय. सार्वजनिक कार्याला मदत करण्या साठीं नाटकें करण्याची चाल इंग्लिश लोकामध्यें विशेष आहे. या चालीमुळें नाट्यकला उत्तम स्थितीला येते, निरुपद्रवी कवीकृतीनें प्रेक्षक मंडळीचें मनोरंजन होतें आणि पैसा मिळाल्यानें मनुष्याची कार्यशक्ती वाढते. परोपकाराच्या दृष्टीनें नाटकांत नाचल्याचा दुष्परिणाम दूर होतो, नाटक करणाऱ्यांस मानवी स्वभाव चांगला कळतो, आणि जो तो आपापल्या रितीनें कांहीं चांगल्या गुणांचा विकास करितो. नाट्यकलेला दोष देण्यांत अर्थ नाहीं. पण या नाटकाच्या नगांत बऱ्या वाईट गोष्टी पुष्कळशा एकत्र होतात. त्यांतून निवडानिवड करण्या इतकी आमची मित्रमंडळी सूज्ञ आहेत. नाटकाच्या नादानें अल्पवयी तरुण विद्यार्थी बिघडतात असा जरी अनुभव आहे तथापि समाजाच्या आश्रया खालीं होणाऱ्या गोष्टीमध्यें अशा प्रकारचा अनुभव येणार नाहीं अशी आह्मा प्रमाणें कोणाची समजूत नसेल असें नाहीं.

---

गेल्या १३ वे तारखेस येथील नेटिव लायब्ररीत मे. हेअर साहेब यांच्या सन्मानार्थ पानसुपारीचा समारंभ झाला. साहेब मजकूर या जिल्ह्यांतून बहुतेक कायमचे जात असल्या मुळें आणि त्यांचीं मागील वर्षे या जिल्ह्यांत गेल्यामुळें या जिल्ह्याच्या लोकांनीं ही पानसुपारी मोठ्या प्रेमादरानें दिली होती. पण साहेबांनीं पुष्कळ आढेवेढे घेऊन अखेरीस सर्वांच्या भेटीच्या लाभा साठीं पानसुपारी कबूल केली. सभेंत कोणी स्तुतीपर बोलूं नये ह्मणून साहेबांनीं सक्तीची ताकीद दिली होती. प्रारंभीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत यांनीं मे. हेअर साहेबांची कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, शोधकपणा इत्यादि गुणाबद्दल त्यांचा धन्यवाद केला आणि नंतर खामगावचा तलाव व आकोल्याचें नळाचें पाणी या दोन गोष्टी साहेबांचे स्मरण चिरकाल देतील असें सांगितलें तेव्हां सर्व सभागृह जयघोषाच्या टाळ्यांनीं दणाणून गेलें. त्या नंतर मेहेरबान मिरझा अब्बासबेग इनामदार यांनीं उर्दूंत जोरदार भाषण केलें. गुदस्ता दुष्काळ, रोगाची भिती इत्यादि विघ्नें आलीं त्या वेळीं मि. हेअर साहेब पाहिजे होते अशी सर्वजणांनीं मोठी आठवण केली; असे हे उत्तम लोकप्रिय अधिकारी आहेत असें सांगून नंतर ती कठीण वेळां मे प्रीडो, ग्यालोवे, महमद इस्मायल व दत्तोपंत भागवत अशा सारख्या पुरुषांच्या उदार कृपेनें निभली अशा विषयीं त्यांनी आनंद प्रदर्शित केला. त्या नंतर मि. हेअर साहेब उत्तरादाखल उर्दूंत बोलले. त्यांची उर्दूभाषा ऐकून सर्व मंडळी आनंद व आश्चर्य पावली. ते ह्मणाले कीं:—माझी बोलण्याची तयारी नाहीं तथापि सर्वांचे आभार मानल्या वाचून राहवत नाहीं. माझी नोकरी या जिल्ह्यांत समली झाली; आणि माझे दोस्त येथेंच आहेत. मी दुसऱ्या ठिकाणीं गेलो तरी माझी नजर आकोल्यासच आहे डिपुटी कमिशनरच्या कामाचा बोजा मोठा असतो तथापि लोकल बोर्ड व मुनसिपालिटी यांच्या मदतीनें तो बोजा हलका वाटतो राजश्री भागवत यांनीं आपल्या लोकल बोर्डाची मदत फार चांगली दिली. आपण मि. प्रिडो साहेब यांस प्लेग संबंधानें उत्तम मदत द्यावी अशी माझी विनंती आहे. प्लेग अगदीं नजिक आला आहे तथापि उमेद आहे कीं देवाच्या दयेनें तो आपल्या प्रांतांत येणार नाहीं. सरकारच्या हुकुमानें प्लेग संबंधी बंदोबस्त नीट होत नाहीं तर आपण सर्वांनीं मदत द्यावी, व लोकांची या बाबदींत योग्य समजूत घालावी. माझ्याबद्दल आपण उत्सव केला ही आपली मोठी मेहेरबानी होय. या समारंभाच्या वेळीं मि० दिनशा काबला यांनीं मि० हेअर यांचे आभार मानून इंडिया देश हा इंग्लिश राष्ट्राचा स्काटलंड किंवा आयर्लंड प्रमाणें एक भाग आहे असें समजून या देशास प्रेमभावानें वागविण्या विषयीं राज्यकर्त्यांस विनंती केली आणि १९ रुपये लायब्ररीस देणगी दिली नंतर प्लेग विषयीचा उपदेश सर्वजणांनीं ध्यानांत धरावा असें सांगून राजश्री भागवत यांनीं हारतुरे, पानसुपारी, अत्तर वगैरे वाटलें आणि सभेचें काम संपलें.

---

## मुंबईची शांतता.

---

प्लेगच्या आजारानें मुंबई शहर ओस पडत चाललें पण दिवसानुदिवस प्लेगचा जोर कांहीं कमी दिसत नाहीं. दररोज प्लेगच्या आजारानें दीडशें दोनशें इसम मरतात. प्लेगचा प्रतिकार करावा ह्मणून मुंबई सरकारनें कडक बंदोबस्त चालविला होता. पण गेल्या ९ वे तारखेस एका मुसलमान तरुण स्त्रीला प्लेग झाल्यामुळें तिला इस्पितळांत नेण्या संबंधानें लढा पडला आणि ती गोष्ट इतक्या निकरावर गेली कीं रिपन रोड, मदनपुरा वगैरे भागांत एकच दंगा उसळला मारहाण सुरूं झाली, कांहीं गोरे अमलदार ठार झाले, दोन तीन हजार इसम एकत्र झाले तेव्हां फौज आणण्यांत आली, गोळीबार सुरूं झाला, कित्येक लोक मेले, जखमी झाले, मृत्युपंथास लागले असा एकच कल्लोळ उसळला! कडवे मुसलमानच दंग्यांत होते असें नाहीं तर हिंदु लोकही पुष्कळ सामील होते. दंगा मिटतो न मिटतो इतक्यांत मजूरदार, गाडीवान, हमाल वगैरे लोकांनीं आपलीं कामें सोडलीं. त्यांचा संप मोठा भयंकर होता. रेलवे, आगबोटी, व मोठमोठे कारखाने यांचीं कामें बंद पडूं लागलीं मजूरदार लोकांनीं काम सोडल्यामुळें सर्वत्र गोंधळ झाला. या कामकरी लोकांचें ह्मणणें असें होतें कीं आह्मी कामावर गेलों असतांना आमच्या मागें प्लेगचे अधिकारी आमच्या बायकापोरांस इस्पितळांत नेऊन टाकतात, घरांतला मालटाल फेकून देतात व आह्मास अन्नपाणी मिळण्याची पंचाईत पडते. अखेरीला लार्ड सांडहर्स्ट यांनीं सर्व जातींच्या पुढारी लोकांची समजूत घातली व प्लेगचा कायदा कडक होता तो लोकांच्या सोयीचा केला. लोकांचीं गाऱ्हाणीं तत्परतेनें ऐकिलीं जातील अशा विषयीं तजवीज केली आहे. सरकारचें योग्य आश्वासन मिळाल्या बरोबर संप मोडले, पुन्हा सर्व गोष्टी सुरळीत चालूं झाल्या आणि हल्लीं सर्व शहरभर शांतता व स्वस्थता झाली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. व्यापार पूर्ववत् चालूं झाले. प्लेगसंबंधानें लोकांस त्रास होणार नाहीं अशी व्यवस्था सरकार करीत आहे. दंग्यांत सांपडलेल्या शेकडो लोकांवर फौजदारी खटले होऊन कैदेची शिक्षा देण्याचा तडाखा चालूंच आहे. एकंदरीनें घडलेला सर्व प्रकार मोठा शोचनीय होय. सरकार व रयत या उभयतांचा एकदील झाला पाहिजे आणि या एकदिलाची जरूरी सध्यांप्रमाणें पूर्वी कधींच नव्हती. परमेश्वर कृपेनें सर्व गोष्टी जुळन येत असून रयतेचा विश्वास सरकारावर अधीक बसला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

---

The Berar Samachar

MONDAY, MARCH 21, 1898.

Recent changes in the educational department of Berar call for more than a casual notice of them. The principle is very bad if nothing else. If economy require the division of the province into four districts for educational purposes we shall first welcome the change by all means. But let us not distort economy to make it a standing evil. The Educational Inspectorship is thought to be unnecessary and if it be a matter of fact or even if the deficit of funds dictate such a procedure we shall request the higher authorities to effect that reform in a decent and useful manner. Divorce with reason is the key to the recent orders. Rao Bahadur S. V. Patwardhan is granted one year's extension of service and with the same breath Mr. V. M. Mahajani is asked to close his office and to conduct the work of two Deputy Inspectors. It is a surmise that with his high salary Mr. Mahajani multiplies his working power in a proportion to lay down a table for future guidance

1 Inspector = 2 Deputy Inspectors of 6 districts + Inspector of 2 districts.

If we be allowed to enlarge the self-same principle we shall have to send away a large number of Tehasildars if we entertain one Commissioner on the roll. The beauty of the matter is that such an order is hurled down upon the Director to work it out We fail to see therein an atom of thought, good sense and arrangement. The dignity, weight of authority and experience of a provincial officer like the Director count for nothing with the supreme officers when he is not to be consulted at all. We do not expect a prudent man of the type of Rao Bahadur Patwardhan to begin with a proposal of this sort. Let us hope that things will improve before we learn to abide by the present arrangements.

---

The non-official members of the Imperial Legislative Council are doing an excellent service to their country though heir voice fails to win the victory

which their logic and marshalling of facts within their knowledge command. The victory of the Government is signal but there is the fatal policy of undermining the good will of the people towards the rulers. The Sedition act is now on the statute-book and the new Criminal Procedure Code will give full force and vitality to the burning jealousy of the Anglo-Indians to muzzle up the Native Press. Whether the Press survives this shock or otherwise, there is he inward voice of conscience that welcomes the loyal tone that has characterized the speeches of the Native members. Some of these speeches have reached the highest watermark of oratory, eloquence, and philosophic and dignified treatment of the subject.

In the Criminal Procedure we have got the different systems of dealing out justice to the Indians and the Europeans and Americans. This chapter is a standing stigma on the English principles of justice and we request our readers to study carefully the learned speech of the Hon'ble Mr. Ananda-Charlu on the trial by Jury. Herein the Madras philosopher proves to the highest satisfaction why the trial by Jury suits well India in all possible matters of detail as it does the English nation. He spoke as follows:—

"We have been alternating during this session between two propositions, *viz*., (1) what in England is sound and good law must be good law for India; (2) diversity of the condition in England and in India makes a law good for the former not necessarily so for the latter. One or other of these was brought before the eye as the legislative thaumatrope revolved before us. I for one unconditionally accept the truth in each of these. There can be no dispute about them so long as they are enunciated in the abstract. But the hitch is felt in their application to concrete cases. The solution, however, is perfect and simple if we go on the right path. Where cognizance has to be taken of special data, characteristic of the one community and totally or substantially absent in the other community, the second proposition is true and ought to be decisive. In every other case the first proposition is true and must command ungrudging acceptance as the upshot of a well attested experience and dependent mainly, if not solely, on the fundamental and immutable features of human nature. To submit to a trial by one's own peers and unhesitatingly to bow to their verdict is a disposition, as to which the question has been asked whether it depends on anything peculiar to the Western communities or whether it is based on ultimate facts of human nature, common to mankind at large and and conductive to good everywhere. There is an opinion that it is of the former kind; but with all deferance to those who hold it I have good reason to demur to it. That opinion to which I do no agree is the unconscious expression o national egotism and of unconsidered dogmatism. This may sound like a bold assertion But it is nevertheless an assertion, as to the soundness of which I am quite convinced on a solid basis in facts. To begin with, let us formulate to ourselves what is the essence of a faith in trial by jury and what is at the root of it. In a passage which I have already quoted more than once, an eminent English Judge thus describes the trial by jury:—

"It is one of the peculiar advantages ... jurisprudence that ... drawn by the unanimous judgment and conscience of twelve men, conversant with the affairs and business of life......and not of one or more lawyers whose habits might be suspected of leading to the indulgence of too much subtlety and refinement."

I ask, in all humility, whether there is in the above statement any reference to anything *special* to the English *nature* and not equally predicable as to the Indians? To the best of my lights I discern none.

The twist that the mind of the lawyers, pure and simple, receives is here noted as tending to lead them astray. No less is this the case in India than elsewhere. The business capacity, the sturdy common sense and the unsophisticated conscience of a body men of ordinary intelligence, chosen irrespective of their likes and dislikes, are set down as fairly infallible guides to truth and as safeguards against error. These features are no less patent and no less potent in the fairly cultured Indians, from among whom the jurors are drawn. So far there are no appreciable grounds to differentiate between the Britisher and the British Indian. What is thus manifest from an analysis of human nature is capable of being established by abundant illustration. What is the Indian traditional trust in the panchayet, as a tribunal of last resort? What is the very meaning of the term panchayet, except this, that the person complained against is ready unconditionally to abide by what *five* men of his choosing without any special leanings for or against him, might decide? What again is at the root of the peculiarly Indian system of disputants submitting to the arbitrament of men freely elected by them but a confidence in their decision? What is the underlying principle of the method known in Hindu society as excommunication, it it is not that the offender has belief in and is therefore ready to bow to the united vote of his brethren in his caste or creed. What again is the over-ruling force in the deliverances of bodies, known as *Parishats* in matters social and even spiritual, but an unqualified credence in the sense of justice and fairness in the guilty man's cultured fellow-countrymen. With so many and so palpable manifestations of the Indian's fidelity in the rectitude of the *four*, the *five* and the *ten* of his own fellows, as the public are called in various parts of the country, it is somewhat grotesque to ignore them and proceed to work as if to the Indian the system of leaving his guilt or innocence to be decided by his brethern is unsuited. What is called trial by jury in legal nomenclature is in essence nothing new to this country, It is only an indigenous plant, pruned and trimmed according to the modern methods and christened with a modern name. These considerations ought to put an end to all dispute on the subject. But there are other valid grounds as well to entitle the Indian to this privilege, hoary as regards him and consonant to the genius of his people.

Those in the legal profession who have had an extensive practice in the original Courts must have been struck, as I have been, as to how a suitor, who believed in the justice of his case, readily and cheerfully submits to arbitration by his own countrymen and how the opposite party with a dubious case resolutely fought shy of them and preferred the toss-up in the regularly-con-stituted Courts where technicalities play an important part. This single fact, if people had used their eyes and their wits, ought to suffice to carry conviction to the most sceptic hearts as to the value of the jury in discovering truth and minimising the chances of greviously missing it It would be a great pity if the Indian should lose his customary advantage by becoming a British Indian."

## वऱ्हाड

हवामान—उन्हाळा प्रखर होत चालला आहे. यध्यंतरीं अभ्रें येऊन मनस्वी उकडतें पण कालच पहाटला चांगली थंडी वाजली. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि० मीर अनवरअली एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं गेल्या २१ वे तारखे पासून दोन महिन्यांची रजा घेतली असून ते छातीच्या आजाराला आषधोपचार करण्यासाठीं आकोल्यास आले आहेत. मध्यंतरी उमरावतीस ही जाण्याचा त्यांचा विचार आहे.

मि० प्राईस एक्स्ट्रा असि० कमिशनर, यवतमाळ यांस ३ महिन्यांची रजा मिळाली असून त्या रजेंत रा० रा० गणेश बापुजी एक्स्ट्रा असि० कमिशनर हे हैदराबादेहून यवतमाळच्या कोर्टावर येत आहेत.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एजुकेशनल इनस्पेक्टर यांच्याकडे नवीन व्यवस्थेखालीं अकोला व बुलठाणें या दोन जिल्ह्यांची डिपुटी इनस्पेक्टरची कामगिरी दिली आहे.

मि. बुलक साहेब एप्रिल १ ली पासून रजेवर जाणार असून मि. क्राफर्ड हे रेव्हिन्यू कमिशनर होतील. व त्याच आठवड्यांत मि. आवर्ड आपल्या जागीं रुजूं हातील.

मि मार्शल एक्स्ट्रा असि. कमिशनर हे खामगांव कोर्टावर जाणार असून मुनशी अजिजुद्दीन हे २६ वे तारखेला अकोल्यास येतील.

डाक्टर लिटल सानिटरी कमिशनर यांच्या सन्मानार्थ गेल्या ८ वे तारखेस उमरावतीस नेटिव क्लबांत उपहाराचा समारंभ झाला. साहेब बहादूर पुढील महिन्यांत रजेवर जातील व ते पुढें या प्रांतीं परत येणार नाहींत. डाक्टर लिटल हे जुन्या, खानदानी व सरदारी बाण्यांतेल गृहस्थ असून अत्यंत लोकप्रिय आहेत.

रा रा कृष्णाजी अनंत तहशीलदार, चांदूर हे तीन महिन्यांची रजा घेणार आहेत.

रा रा भगत तहशीलदार यांनीं मेहकरच्या तहशिलीचा चार्ज घेतला आणि त्यांच्या मोर्शीच्या जागीं मि. डी. डी. दादीमास्तर चीफ कानस्टेबल, शेगांव यास तहशीलदार नेमलें.

नोटीस

किसनराव वल्लद मण्याबापु देशमुख लासडकर राहणार कजबे हिवरखेड तालुके अकोट यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास माझे वतीनें काम चालविण्यास कुलमुकत्यारपत्र दिलें आहे. हल्लीं तुह्मास दिलेलें कुलमुकत्यारपत्र मी आज तारखेपासून रद्द केलें व माझें स्वतःचें कामासाठीं माझा दत्तक मुलगा निळकंठराव काशीराव यास कुलमुकत्यार नेमलें आहे हें आपणास कळावें. तारीख १९ माहे मार्च सन १८९८ इसवी दस्तुर रामकृष्ण राजाराम वि. रा. अकोलें

सही

सोनाबाई जवजे काशीराव देशमुख
राहणार हिवरखेड नि. बांगडी

नोटीस.

रा० रा० मिठू वल्लद हिरामण माळी राहणार पाथर्डी तालुके अकोट.

यांस.

नोटीस देणार मारोति वल्लद सोनाजी माळी राहणार पातुर्डे बुजरुख तालुके जळगांव नोटीसीनें असें कळवितो कीं तुमची कन्या नामे बजी मर्द मारोति ही माझी लग्नाची बायको असून नाहाती धुती आहे. तिजला तुह्मी अलिकडे ४–५ चार पांच वर्षां। मी स्वतां तिजला घेण्याकरितां आलो असून तुह्मी तिजला लाऊन दिली नाहीं याजकरितां तुह्मास ह्या नोटीसीनें असें कळवितोकीं नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत माझी बायको माझे घरी आणून पोहचती करावी असे न केल्यास रीति प्रमाणें ताब्यांत घेण्याबद्दल काम चालवून ताब्यांत घेतली जाईल. आजपावेतो सदरील लिहिलेली चार पांच वर्षें तुह्मी आमचे बायकोस पाठविली नाहीं व तिजला सदरहू मुदतींत अन्नवस्त्राबद्दल जो खर्च झाला असेल त्याजबद्दलचे कोणच्याही प्रकारानें आह्मी जबाबदार नाहीं कारण आह्मी स्वता तिजला घेण्या करितां पांच सहा वेळा आलो होतो. व आज पांच सहा दिवसाच्यापूर्वी ही घेण्यास आलो होतो परंतु तुह्मी पाठविली नाहीं याजवरून तुमच्या मनामध्यें विकल्प दिसतो याजकरितां तुह्मास आणखी असें ही कळवितोकीं माझी बायको आमच्या चार जातभाई गृहस्था प्रमाणें तिजला वागविण्यास सर्व प्रकारानें तिजला वागविण्यास मी तयार आहे. सोड चिठ्ठी वगैरे देण्यास कोणच्याही प्रकारानें मी कबूल नाहीं हे तुह्मास कळावें ह्मणून दिली नोटीस सही. तारीख १९ माहे मार्च सन १८९८ इसवी.

सही

सही मारोती सोनाजी माळी
राहणार पातुर्डे बुा. तालुके
जळगाव दस्तुर खुद्द.

जाहिरात.

सर्वत्र लोकांस व जातभाई यांसः—

खाली सही करणार याजकडून असें जाहिर केले जाते कीं मिठु वल्लद हिरामण माळी राहणार पाथर्डी तालुके अकोट याची मुलगी माझी बायको नामे बजी ही आहे. हिच्याशी जर कोणी माझ्या संमती शिवाय घरठाव वगैरे करील तर त्याबद्दलचा सर्व प्रकारचा तो जबाबदार धरून त्यास जबाबदार धरला जाईल. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख १९ माहे मार्च सन १८९८ इसवी.

सही

सही मारोती सोनाजी माळी
राहणार पातुर्डे बुा. तालुके
जळगांव दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

विलायतेस असलेले संस्कृत पंडित माक्समुलर साहेब यांनीं स्वकृत ऋग्वेदाचें एक पुस्तक तुरुंगांत असलेले मि. टिळक यांच्या नांवावर नुकतेंच पाठवून दिलें व तें तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें सरकारच्या परवानगीनें मि. टिळक यांच्या स्वाधीन केलें अशी एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. खरी असल्यास मोक्षमुल्लर यांनीं स्वतां केलेलें ऋग्वेदाचें पुस्तक पाठविण्यास स्थळ चांगलें पाहिलें असून काळही उत्तम पाहिला यांत कांहीं शंका नाहीं. आणि त्यांच्या या देणगीनें मि. टिळक यांसही आपलें तुरुंगांतलें आयुष्य जास्त सुखानें घालविण्यास चांगलें साधन होईल यांत कांहीं शंका नाहीं. मि. टिळक यांस झालेली कैदेची शिक्षा सक्तम जुरीची नसावी असें जाणून टिळकांसारख्या पंडिताकडून आपल्या या ग्रंथाचें संशोधन होण्यास ही संधी अत्युत्तम आहे अशा समजुतीनें जरी मोक्षमुल्लर यांनीं आपला हा ग्रंथ या वेळीं मि. टिळक यांजकडे पाठविला असला तरी हा ग्रंथ आपला तुरुंगांतला सोबती आहे ही गोष्ट यावज्जन्म मि. टिळक हे विसरणार नाहींत, इतकेंच नव्हे तर तुरुंगवास भोगित असलेले आह्मा सर्वांचे आवडते मित्र मि. टिळक यांस पंडित मोक्षमुल्लर यांनीं या वेळीं आपलें ऋग्वेदाचें पुस्तक नजर केलें ही गोष्ट हिंदुस्थानांतल्या समजुतदार अशा सर्व लोकांच्या मनांत कायम प्रमाणें राहील यांतही कांहीं शंका नाहीं.

मि. टिळक यांस बंदमुक्त करण्याच्या संबंधानें विलायतच्या बड्या व वजनदार अशा कांहीं लोकांचा उद्योग चालू झाला आहे असें सांगतात. खरें असलें तर आनंदाचें आहे, पण तें खरें मानण्यास कांहीं विशेष आधार आहे कीं नाहीं याची शंकाच आहे. मुंबई सरकारही मि. टिळक यांस सोडण्याच्या विचारांत आहे असेंही सांगतात, पण त्यांत लोकांच्या कल्पनेवाचून अधिक कांहीं आहे असें अजून कांहीं दिसत नाहींच. मि. टिळक यांस शिक्षा झाल्या बद्दल किंवा सरकार त्यांस सोडीत नाहीं या बद्दल सरकारास दोष देण्याचा नेटिव पत्रांचा क्रम बंद होऊन सर्व शांत होईल तर सरकार मि. टिळक यांस सोडण्यास कसर करणार नाहीं असें ज्ञानोदयाचें ह्मणणें असून तें अगदीं रास्तही आहे आणि अरुणोदयानें तें दोन महिन्या पूर्वींच ह्मटलेलें आहे, याकरतां लोक त्याचा विचार करतील अशी आशा आहे.

निजामच्या राज्यांत पाकल तालुक्यांत काळकोडाचा एक नवा रोग सुरू झाला असून रोज ९० माणसें मरतात असें सांगतात.

१८७६।७७ सालचा दुष्काळ मुंबई इलाख्यांत ३४,१८९ चौरस मैलांत होता व १८९६।९७ चा ४७,१०८ चौरस मैलांत झाला. १८७७ च्या दुष्काळांत ९०,१८,९९० माणसें सांपडलीं होतीं व १८९७ च्या दुष्काळांत ७८,९१,०७३ सांपडलीं होतीं. १८७७ च्या दुष्काळांत दररोज सरासरी ३,३२,८३७ माणसांस पोसावें लागत असून १८९७ च्या दुष्काळांत ३,२१,८३३ माणसांस रोज पोसावें लागत होतें.

इंग्रजसरकाशीं लढत असलेले सरहद्दीवरचे पुष्कळ डोंगरी लोक आतां सल्ला करण्याच्या तयारींत आहेत. ज्यांनीं सरकारांच्या अटी कबूल केल्या त्यांच्याशीं सरकार कशा रीतीनें वागत आहे हें पाहण्याकडे इतर लोकांचें लक्ष्य लागलें आहे. हल्लींचें सरहद्द प्रकरण सुरू होण्याच्या पूर्वीं सरहद्दीवरच्या कित्येक जातीच्या लोकांस सरकाराकडून राजकीय पेन्शनें मिळत असून कित्येक लोक सरकारच्या पलटणींत चाकऱ्या करीत असत. आतां त्या लोकांशीं सरकारचा सल्ला झाल्यावर सरकार कशा रीतीनें वागतें हें ते पहात आहेत. पहिल्या प्रमाणेंच विश्वासानें वागत आहे असें आढळल्यास ते इतर लोकही सरकारशीं सल्यानें वागण्यास तयार होणार असें दिसतें.

कलकत्यास नाण्याची फार टंचाई झाली असल्यामुळें लोक आपले शेर, हुंड्या वगैरे किंमतवान कागद विकण्यास काढीत आहेत.

ब्रह्मदेशांत यंदा ९९,९४,२७९ एकरांत भाताची लागवड झाली असून आज बाहेर देशीं पाठविण्यास त्या देशांत १९,३०,००० टण तांदुळ शिलक आहेत.

चीनसरकार आपल्या राज्यांत दहा लाख चिनी नाणे पांच टक्के व्याजानें वीस वर्षांत फेड करण्याच्या करारानें कर्ज काढीत आहे. विलायतसरकार चीनास ४॥ टक्यांनीं कर्ज देत आहे.

विलायतचे प्रधान लार्ड सालिसबरी तापानें आजारी झाले आहेत.

विलायतची फौज वाढवून तिचे पगारही वाढवीव असें पार्लमेंटच्या कामन सभेनें ठरविलें.

कोरियानें आपलें एक बेट रशियास पट्यानें दिलें आहे.

चीनचें राज्य स्वतंत्र राहावें अशी इंग्लंडची इच्छा आहे व त्याचे तुकडे करून घेण्यास इंग्लंड तयार नाहीं असें इंग्रज अधिकाऱ्यांचें ह्मणणे आहे.

सायामसरकारानें आपली फौज न्युट्रल झोन बाटनबर्ग कडे पाठविली आहे. ठा. अ

कराचीस थोडे दिवसापूर्वीं अमेरिकेहून एक मोठी आगबोट भरून कॅरोसिन तेल येऊन दाखल झालें आहे. इतकें तेल आणि तेंही एकच आगबोटींतून आजपर्यंत कराचीस आल्याचा दाखला नाहीं. हें सांठविण्याची तेथें विशेष सोय करण्यांत आली आहे.

जर्मनींत कागदाच्या बाटल्या तयार करूं लागल्याबद्दलची हकीकत आमचे वाचकांस ह्या पूर्वींच श्रुत झाली आहे हल्लीं अशा प्रकारच्या बाटल्या तयार करणाऱ्या कारखानदारानें आगबोटीवर बाटल्या पुरविण्याचा मक्ता पतकरला आहे ह्यापूर्वीं आगबोटीवर त्यांच्या हेलकाव्यांनीं बाटल्या वगैरे कांचेचें सामान फार फुटत असे. ती भीति कागदी बाटल्या उपयोगांत येऊं लागल्या मुळें आतां नाहींशी झाली. ह्या कागदी बाटल्या उत्तम प्रकारें जलप्रतिबंधक बनवल्या असल्या मुळें त्यांतून प्रवाही पदार्थ झिरपून बाहेर येण्याची व नासण्याची वगैरे भीति मुळींच नाहीं. चहाचे प्याले व बशा वगैरेही कागदीच होणार आहेत. असें झाल्यास किती तरी फुटतूट वांचेल?

पदवी विक्रय—इटालियन पार्लमेंटापुढें एक पदवीविक्रयाचे कायद्याचा खर्डा आला आहे. त्याचा मतलब असा आहे कीं, ज्या कोणास "राजपुत्र ( प्रिन्स )" ही पदवी पाहिजे असेल त्यानें सरकारांत ४०,००० लायर ( इटलींतील नाणें ) भरावें; मार्किसची पदवी इच्छिणारास २५००० लायर, कौंट पदवी घेणारानें २०,००० लायर व्यारन पद घेणारानें ५०० लायर आणि 'कोट् ऑफ् आर्म्स, चा हक्क पाहिजे असेल त्यानें १००० लायर सरकारांत दिले पाहिजेत; ह्मणजे त्या त्या पदव्या त्या त्या फी भरणारांस देण्यांत येतील. येणेंप्रमाणें पदवीविक्रय करून तें सरकार पैसा जमविण्याचे विचारांत आहे; व या पदवीविक्रयानें चांगली प्राप्ति होईल असा इटालियन पार्लमेंटास अजमास आहे. अशा विकत घेतलेल्या पदव्यांमध्यें खरा मान काय असणार हें आह्मास समजत नाहीं. त्या पदव्यांचे योगानें त्या त्या पदवीधारांची त्या त्या पदवीप्रमाणें संपत्तिमत्ता मात्र दिसेल. अशा पदव्या इकडेही विकण्याचे इंग्रज सरकारानें सुरू केलें तर तेणेंकरून सरकारास बरीच प्राप्ति होईल. कारण इकडे पदव्यांचे फाजील शोकी लोक कमी नाहींत. ज्ञा. च.

दक्षिणेंतील एडिटरांस सोडविण्याचा अर्ज. दक्षिणेंतील वर्तमानपत्रकर्त्यांस शिक्षा झाल्या त्या अन्यायानें झाल्या असें न ह्मणतां दयेनें त्या कमी करण्यांत याव्या अशा मजकुराचा एक अर्ज विलायतेंत लोकांनीं पार्लमेंटास केला होता. त्यावर प्रो. मोक्षमुल्लर सर विल्यम वेडरबर्न, सर विल्यम हंटर, सर रिचर्ड गार्थ, मि. केन, मि. दत्त इत्यादि लोकांच्या सह्या होत्या. त्यामुळें त्या अर्जाचा कांहीं तरी चांगला परिणाम होईल अशी आशा वाटत होती, परंतु "मुंबई सरकारच्या कामांत हात घालण्याची इच्छा नाहीं" असा स्टेट सेक्रेटरीकडून ठरावजबाब मिळाल्यामुळें ती आशा निष्फल झाली "टिळकांचीं आर्टिकलें उघडपणें खुनास उत्तेजक अशींच होती" असेंही सेक्रेटरी साहेबांचें ह्मणणें होतें तथापि मि० टिळकांस सक्त शिक्षा भोगावी लागत नाहीं येवढें सांगण्यांत आलें आहे. सु०

गेले बुधवारीं मुंबईस प्लेगतपासणीसंबंधानें लोक खवळून मोठा दंगा झाला. दंग्याला आरंभ मदनपुऱ्यांत जुलई लोकांकडून होऊन एकाएकी तो सर्व शहरभर पसरला. दंगेखोरांनीं प्लेगहास्पिटलावर हल्ले केले, कांहीं ठिकाणीं आगी लावल्या व रस्त्यांत सांपडेल त्या युरोपियन वगैरेला ठोकण्याचा सपाटा चालविला. दंगेखोर पोलीसाला जुमानीनांत. मि. दस्तूर फो. प्रे. माजिस्ट्रेट, हे बंदोबस्तास आले तों त्यांजवरही हल्ला होऊन त्यांस इजा झाली. तेव्हां त्यांनीं दंगेखोरांवर गोळ्या घालण्याचा हुकूम दिला. तेथें ४ इसम ठार व ३ जखमी झाले. दंगेखोरांनीं २ युरोपियन सोल्जर ठार केले, पुष्कळ युरोपियन आणि नेटिव अधिकारी जखमी केले व प्लेगचे रोगी नेण्याच्या गाड्या वगैरे पुष्कळ जाळल्या दंगेखोरांपैकींही पुष्कळ जखमी झाले आहेत पलटणीचे लोक आले तेव्हां दंगा बंद झाला. एकंदर ७ नेटिव व ३ युरोपियन मेले. १००-१२५ लोक कैद केले आहेत. दंगेखोरांनीं टेलिग्राफ व टेलिफोनच्या तारा तोडल्यामुळें इकडची तिकडे बातमीही लवकर समजेनाशी झाली होती. हल्लीं दंगा बंद आहे. पण रेलवे, डाक, वगैरे कडील मजूरांनीं काम न करण्याचा कट केला असून दुकानें बंद आहेत. क० त०

आरबी समुद्रांत वृष्टी व तुफान होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

निजाम हैद्राबादच्या दिवाणाचे खासगी सेक्रेटरी मि. एफ. जे. वाळा हे गेल्या बुधवारी घोड्यावरून पडल्यामुळें त्यांना बरीच इजा झाली आहे.

खांडवा येथील एका शाळा मास्तरणीवर बंगातल्या एका मुलीच्या गळ्यांतील दोन पुतळ्या चोरल्या बद्दल खटला झाला आहे. अल्पवयीं मुलींना असल्या मास्तरणी चोरीचेंच शिक्षण देणार तर!

निजाम कॉलेज ( हैद्राबाद येथील ) चे हेडमास्तर मि. सीटन हे लवकरच पेन्शन घेणार असल्याचे कळतें.

कॉमन्स सभेंत युगेंडा प्रकरणाबद्दल बराच वादविवाद चालला होता. मि कर्झ यांनीं असें बोलून दाखविलें कीं, युगेन्डा येथें ४०० हिंदु लोक, ७०० सौदनीज लोक आणि स्वाही शिपायांची एक पलटण इतकें सैन्य ठेवण्याचा विचार आहे सौडनीज लोकांच्या तक्रारी विषयीं तपास चालावयाचा आहे. असें त्यांनीं खात्रीपूर्वक सांगितलें असून मेजर मॅकडोनल्ड यांच्या माथ्यावर या बाबतींत कोणत्याही प्रकारचा दोष लादतां येत नाहीं. तेथील युरोपियन लोक कंपाला किल्ल्यांत सुरक्षित आहेत. ग०

पुणें शहरांतील देशी वैद्य, डाक्टर व हकीम या सर्वांस असा हुकूम करण्यांत आला आहे कीं, गावांतील कोणत्याही रोगानें आजारी झालेला इसम त्यांजकडे गेल्यास त्यांनीं त्यांस औषधी योजना न करतां त्या बद्दलची बातमी म्युनिसिपल कमेटीस कळवावी. कमेटींत त्यांच्या नांवाचे रजिस्टर ठेवलें जाऊन कमेटीच्या गोऱ्या डाक्टर कडून त्याला औषधपाणी देण्याची व्यवस्था केली जाईल अशा प्रकारचा हुकूम जारी करण्यांत अधिकाऱ्याचा काय उद्देश असेल बरें! वैद्य, डाक्टर व हकीम यांस फांके मारीत बसविण्याचा तर नाहींना?

मुंबई शहरांत दंगा झाल्यामुळें प्रत्येकाच्या तोंडचें पाणी पळालें आहे. केव्हां कोणत्या वेळीं काय होईल आणि काय नाहीं अशी सर्वत्र भीति वाटूं लागली आहे. रहिवाशांना आपापला दैनिक व्यापार चालविण्यांच अत्यंत कठिण पडलें आहे. याच वेळीं लखनौ, पुणें वगैरे ठिकाणीही दंगे झाल्याच्या दाट वदंता कानावर येऊं लागल्या आहेत. लखनौ येथें दंगा झाल्याची अफवा निराधार आहे. पण पुण्याविषयीं सर्वांची मनें दुग्ध्यांत आहेत. शहरांतील व्यापार बहुतेक बंद झाल्यामुळें भाजीपाला, दाणागोटा, कापडचोपड, तेलतूप वगैरे जिन्नस मिळण्याची फारच मारामार पडली आहे. घटकोघटकीं, दंगा, आग, मृत्यु अशा कर्णकठोर वार्ता ऐकण्याचा प्रसंग येतो. तपासणीचीं कामें बहुतेक बंद पडली आहेत. या प्रमाणें आजकालची मुंबई ह्मणजे भीति, चिंता, त्वेष याचें अगदीं माहेरघर बनून गेली आहे. गुराखी.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ......८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ............................ 4as

Advertisemen
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 28 MARCH 1898 NO 12

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २८ माहे मार्च सन १८९८ इ० अंक १२

### जाहिरात.

खालीं सही करणार इजकडून आसरापा वल्द सालापा वाणी राहणार मौजे वरूड तालुके चिखली जिल्हा बुलडाणें हा मज-कडून एकाच कामांत ह्मणजे सर्वे नंबरची विल्हेवाट करण्यास विशेष मुखत्यार नेमला होता. व तें काम हल्लीं आटापलें आहे. या कामापेक्षां जास्त काम मुकत्यार इसम करित आहे. व त्यापासून माझें नुकसान होण्याचा संभव आहे. करितां या नोटीशीनें जाहीर करण्यांत येतें कीं, सदरहू कामा शिवाय मुकत्यार इसमानें जें कांहीं काम केले असेल, तें मजला कबूल नाहीं. व मी त्यांचें मुकत्यारपत्र रद्द केलें आहे कळावें. ता. २४।२ सन १८९८ इ०

सही

मुक्ताबाई जवजे बापू आयाजंगम सावळीकर हल्लीं मुकाम केकत उमर तालुके व जिल्हा वाशीम वऱ्हाड. सहीची निशाणी बांगडी दस्तुर जनार्दन गणेश वैद्य उमेदवार वस्ती वाशीम.

---

### नोटीस

रा. रा. रामसुख राजाराम मारवाडी राहणार चांदणी तालुके बाळापूर यांस.

खालीं सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी आपले मौजे चांदणी येथील शेत 'मोहाडी' नांवाचे मला १२९ रुपयांस विकत दिलें. तुह्मी मला खरेदीखत करून नोंदून दिलें आणि तुमच्या रकमेची आदाईही होऊन चुकली आहे. परंतु तुह्मी अद्याप शेताचें खातें बदलून माझ्या नांवानें करून दिलें नाहीं. खातें वर्ग करून देण्याबद्दल मी वारंवार तुह्मास ह्मटलें पण तुह्मी टाळटाळ करीत आला. ही नोटीस पोचल्यानंतर तुह्मी आठ दिवसांच्या आंत खातें बदलून द्यावें आणि तसें न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून शेताच्या खात्याचा वर्ग करविण्यांत येईल आणि त्या शिवाय कोर्ट खर्च, या नोटीशीचा खर्च व इतर नुकसान यांची जोखीम तुमच्या शिरावर बसेल कळावें. २१ मार्च १८९८ इसवी.

सही

सखाराम वल्लद देवराव पाटील वस्ती चांदणी दस्तुर निशाणी वखर.

---

### नोटीस

चि. रा. रा. बनशी आपा वल्लद भाऊ आपा वाणी वस्ती एदलाबाद जिल्हा खानदेश याही. नोटीस देणार गणाप्पा वल्लद यावलापा वस्ती खामगांव नोटीसीनें असे कळवितो कीं माझी कन्या नामे सारजी ही तुझी लग्नाची बायको असून आज अदमासे चार वर्षे झाली तीजला तू माहेरी मजपाशीं आणून घातलीस त्या वेळपासून आजपावेतो तूं तिच्या अन्नवस्त्राची कोणत्याही प्रकारानें तजवीज केली नाहीं चार वर्षांत दोनशे रुपये कर्ज काढून तिचें आह्मी संगोपन केलें गेल्या वर्षी तूं तिजला नेण्या करितां आला होतास त्यावेळीं चार जातभाई पंचा समक्ष तूं सदरहू पोटगीच्या रुपया पैकीं वीस पंचवीस रुपये तूर्त देऊन तिजला घेऊन जातो असें सांगितलेंस त्यावेळे पासून अद्याप पर्यंत तुझा ठिकाणा नाहीं करितां सदरहू नोटीसीनें तुजला असें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत तिच्या सदरहू झालेल्या पोटगीच्या रुपया बद्दल व चालू पोटगी बद्दल निकाल करून तुझे बायकोस घेऊन जावे. असें न केल्यास सरकारांत काम चालवून रीतशीर तजवीज केली जाईल ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २९।३।९८ इ.

सही

सहीची निशानी तराजू गणापा वल्लद यावलापा भीठकरी याची असे

---

## वऱ्हाडसमाचार

मित्ती चैत्र शुद्ध ६ शके १८१९

सर हेनरी फौलर यांनीं कामन्स सभे मध्यें गेल्या महिन्यांत या देशाच्या साऱ्याच्या पद्धती संबंधानें मोठी तारीफ केली इंडियांतील पद्धती त्यांस फार पसंत पडल्या मुळें त्यांनीं आपल्या वर्णनाच्या बहारींत कळविलें कीं आयर्लंडाला जर ही धाऱ्याची पद्धती लागूं केली तर मस्तुरांचीं गाऱ्हाणीं दहाव्या अंशानें देखील शिल्लक राहणार नाहींत. माजी स्टेट सेक्रेटरीस इंडियांतल्या तीन गोष्टी फार आवडल्या. सारा माफक आहे ह्मणजे पिकाच्या किंमतींतून शेंकडा ८ या प्रमाणानें सरकारास सारा द्यावा लागतो; साऱ्याची पद्धती पीडाकारक नाहीं; आणि रयतेनें जमिनींत सुधारणा केली तर त्या सुधारणेवर सारा वाढविला जात नाहीं या तिन्ही गोष्टी वस्तुतः प्रजेला अत्यंत हितकारक आहेत पण इंडियांत या तिन्हींचा चांगला अभाव आहे ह्मणून प्रत्येक सत्यवादी माणसांस मोठें दुःख वाटेल. या तीन गोष्टी इंडियांत कितपत उपलब्ध आहेत याचें चित्र मद्रासच्या नामांकित 'हिंदु' पत्रकारानें बरोबर वठविलें आहे. काय चमत्कार असेल तो असो, इंडियाची वस्तुस्थिती विपर्यासानें विलायतेंत सर्वांगसुंदर दिसते हें मोठें नवल होय. वरील प्रकारच्या विधानानें सर हेनरी फौलर यांच्या स्टेट सेक्रेटरीपणाचा दांडगा अनुभव उजेडात आला. जी गोष्ट अनुभवांतली नसेल ती कल्पनेनें खऱ्यापेक्षां अधिक खरी भासवितां येते आणि तशांत ब्रिटिश सरकारचा पोंवाडा गाण्याचा प्रसंग आला तर त्यांच्या ज्ञानभांडातले अमोल हिरे जगापुढें येतात असेंच ह्मटलें पाहिजे.

सर फौलर यांच्या ह्मणण्या प्रमाणें जमिनीच्या सुधारणेवर जर सारा वाढला नसता तर इंडियन लोक फार सुखी असते. आयर्लंडांत असा सारा न वाढविण्याचा कायदा नाहीं ह्मणून आमच्या देशा पेक्षां तो देशच फार बरा होय. रयतेनें आपला पैसा खर्चावा, जमीन उत्कृष्ट करावी आणि त्याचा फायदा सरकारला साऱ्याच्या वाढीनें भरून मिळावा ही गोष्ट प्रजेला फार अनिष्ट असें सर हेनरी ह्मणतात. जमिनीच्या सुधारणेवर सारा वाढविणें ह्मणजे कायद्याच्या विरुद्ध आहे. खरोखरच असा उत्तम कायदा इंडियांत वर्तमान असल्या विषयीं आह्मास कोणी दाखवील तर आह्मी सर फौलर पासून सर्वांचे मोठे आभारी होऊं. असला कायदा पाहिजे ह्मणून इंडियन लोकांची ओरड पुष्कळ जुनी आहे. खाजगी खर्चानें झालेली सुधारणा सर्व्हेकडील आफिसर साऱ्याच्या वाढी खालीं आणीत नाहींत असा चुकीचा ग्रह आहे पण वस्तुतः जमिनीची वर्गवारी पुनः पुनः करितात आणि चांगल्या प्रतीच्या जमिनीवर सारा अधीक बसवितात. जमिनीची प्रतवारी लावतांना तिचा मगदूर लक्ष्यात घेतात ह्मणजे जी जमीन सुधारण्यात आली आहे तिचा मगदूर अधिक लावून त्याबद्दल साऱ्याची आकारणी वाढवितात. सारांश, जमिनीची सुधारणा सुधारणेच्याच नांवाखालीं अधिक साऱ्याला पात्र ठरवीत नाहींत तर तिच्या उच्च प्रतवारीनें तिचा सारा वाढवून देण्याचा प्रघात या देशांत सर्वत्र आहे. मद्रास सरकारनें हा प्रघात बंद करावा ह्मणून १८८८ सालीं एक उत्तम सूचना केली होती. लार्ड कानेमारा साहेब या सूचनेचे मुख्य प्रवर्तक होते. सरकारनें एक स्पष्ट कायदा करावा कीं नवीन तरमबंदीच्या वेळीं जमिनीची जुनी प्रतवारी कायम ठेवावी व ती बदलूं नये. अशा नियमानें जमीन सुधारल्या पासून होणारा मोठा फायदा रयतेचा रयतेसच मिळेल विनाकारण सरकारची मागणी वाढणार नाहीं आणि रयतेच्या वहिवाटीचा रयतेला पक्का स्थीरपणा वाटेल. ही सूचना अद्याप अंमलात आली नाहीं. नवीन प्रतवारी करितांना सर्व्हेकडील अधिकारी गरीब रयतेला अगदीं नागवितात आणि गैरविश्वासानें व वहिवाटीच्या अस्थैर्यामुळें रयत लोकांस जमीन उत्कृष्ट देशेला आणण्याची आशाच वाटत नाहीं.

जमिनीचा सारा माफक नाहीं इतकेंच नाहीं तर पूर्वींचा भारी सारा उत्तरोत्तर सर्वत्र वाढविण्यांत आला आहे. सर फौलर यांनीं सांगितलेली माफक साऱ्याची गोष्ट आह्मास स्वप्नवत् मिथ्या वाटते. सरकारी रिपोर्टांवरूनच साऱ्याच्या वाढीची कल्पना चांगली करून देता येईल. गेल्या १ ले तारखेस मध्य प्रांता विषयीं सर जान वुडबर्न यांनीं नामदार चिटणीस यांस कळविलें कीं नुसत्या मध्यप्रांतांतच सन १८८९ च्या आक्टोबर १ ले तारखे पासून आज मित्तीला साऱ्याचें उत्पन्न २२,८३,२३३ रुपयांनीं वाढलें असून इतर पट्ट्यांचें उत्पन्न ३,२३,१०७ रुपये वाढलें आहे. मध्य प्रांताची जी दशा तीच दशा सर्व इंडियाची आहे. सारा वाढविण्याचे मूळ कारण वारंवार होणारी नवी नवी तरमबंदी होय. साऱ्याचा बोजा इतका वाढला आहे कीं सर्व रयत सावकाराच्या कर्जा खालीं चक्काचूर झाली आहे किंवा उपासमारीच्या चक्रांत मरणोन्मुख होत आहे. सर फौलर यांच्या ह्मणण्या प्रमाणें सारा पिकाच्या किंमतीवर शेंकडा ८ प्रमाणावर आहे. हें उत्तम प्रमाण सर फौलर यांस कोठें आढळलें याची कल्पना आह्मास इंडियांत येण्यासारखी नाहीं. सन सन १८५६ सालीं कोर्ट आफ डायरेक्टरांनीं व त्यांच्या मागून सन १८६४ सालीं सर चार्लस वुड यांनीं असा नियम घालून ठेविला आहे कीं सरकारी सारा ऐन उत्पन्नाच्या किंमतीवर शेंकडा ५० या प्रमाणा पेक्षां अधीक नसावा. या प्रमाणावरून साऱ्या संबंधाची जुनी कल्पना किती दांडगी होती हें स्पष्ट कळेल. हें प्रमाण जर कायम असतें तरी देखील आह्मी स्वतांस नाशिबवाले लेखिलें असतें. परंतु साऱ्याची वाढ या प्रमाणापेक्षां फार मोठी आहे. प्रसंगोपात जमिनीच्या वहितदाराला त्याच्या कष्टाची मोलमजूरी सुद्धा पुरेशी मिळत नाहीं. आणि जमिनीकडे जो पैसा लाविला जातो त्याचें व्यानही चांगलेंसें पडत नाहीं. सरकारी सारा भागविण्या साठीं शेतांतल्या मालाला बाजार दाखवावा लागतो. कित्येक ठिकाणीं ज्या जमिनींतून साऱ्या इतकें उत्पन्न होत नाहीं त्यांच्या वर सारा भक्कम बसविला आहे. सरकारी साऱ्यामुळें शेतकरी ठार बुडत चालले, कसा तरी ते दिवस कंठतात आणि त्यांचाच थोरला जनसमूह असल्यामुळें या देशांत घोर दारिद्र्यांत व उपासमाऱ्यांत आयुष्याचे दिवस मोजणारी प्रजा सर्वत्र बनली आहे. सरकारी सारा लोकांच्या पोषणाच्या नळ्या शोषून घेतो आणि रयतेला अनाथ करून सोडतो!

दक्षिणेंत शेतकऱ्यांचा कायदा पसार झाला त्या वेळीं सरकारच्या निदर्शनास आलेल्या गोष्टी सरकार ध्यानांत धरील तर प्रस्तुतची धाऱ्याची पद्धती कायम राहणार नाहीं. हें चित्र खोटें ह्मणण्याचा दिवस उगवेल व आमच्या डोळ्यापुढें सर फौलर यांची काल्पनिक सऱ्याची पद्धती अनुभवास येईल तर आह्मी आमचें भाग्य उदयास आलें असें समजूं.

इंडिया गरीब आहे आणि ही गरिबी अगदीं शेवटल्या पायरीला पोंचली आहे ही गोष्ट रात्रंदिवस जशी प्रजेच्या डोळ्यापुढें तशी सरकारच्या डोळ्याला दिसत नाहीं. हा अंधपणा फार वाईट आहे आणि यापेक्षां अधीक दुःखकारक प्रकार ह्मटला ह्मणजे खऱ्या स्थितीच्या उलट प्रकार सरकारला खरा वाटावा. ही भयंकर चूक स्टेटसेक्रेटरींनीं केली आहे लार्ड हामिल्टन साहेब यांस इंडिया देश अजून सुवर्णभूमि दिसतो हें आमचें दुर्भाग्य होय. गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या २२ वे तारखेस त्यांनीं कामन्स सभेंत वरील आशयाचें भाषण केलें ह्मणून आह्मास मोठें नवल वाटतें. त्यांच्या भाषणाला उत्तर दाखल गेल्या 'इंडिया'च्या अंकांत खरमरीत लेख प्रसिद्ध झाला आहे. स्टेट सेक्रेटरीच्या भाषणांत मूळ सिद्धांत तीन आहेत. पहिला मुद्दा हा कीं इंडिया देश लोक ह्मणतात तितका दरिद्री नाहीं. शिवाय सरकारी कर फार थोडे आहेत, [२] या वर्षीं जितकी मोठी तूट पडेल असें वाटलें होतें तितकी तूट न पडतां फक्त ६॥ कोट रुपयांची तूट पडेल असा रंग दिसतो. आणि [३] कसाही प्रकार असला तरी इंडियाला भीक घालण्याची जरूरी नाहीं.

इंडियांत कराचा बोजा खरोखर हलका आहे काय याचा प्रथम विचार करूं. लार्ड हामिल्टन इंडियाच्या दारिद्र्या विषयीं ह्मणाले कीं जरी जनसमूह अगदीं गरीब आहे तरी त्यांच्यावर कर फार कमी आहेत हें विसरतां कामा नये पृथ्वी वरील सुधारलेल्या राष्ट्रा मध्यें ज्या प्रमाणानें सरकारी करांचा बोजा असतो त्या प्रमाणा पेक्षां कमी प्रमाणावर इंडियांत करांची आकारणी होत आहे. हा आंकड्यांवर बसविलेला प्रमाणाचा सिद्धांत अगदीं वेडगळपणाचा किंवा मोठ्या लबाडीचा आहे असें ह्मटलें पाहिजे.

परंतु या प्रमाणावर बसविलेल्या अनुमानांत एक मोठी गोष्ट चुकते ती ही कीं थोड्या उत्पन्नांतून थोडा कर देणें जितकें भारी व कठीण वाटतें तितकें मोठ्या उत्पन्नांतून मोठा कर देतांना वाटत नाहीं. या चुकीमुळें परिणामीं मोठे अनर्थ होतात आणि ते सध्यां इंडिया देशाला भोगावे लागत आहेत. इंग्लंड व इंडिया या दोन देशांची तुलना केली असतां आमच्या ह्मणण्याचा खरेपणा कळून येईल, १८९५-९६ साल हिशोबासाठीं घरूं.

| | इंग्लंड | इंडिया |
|---|---|---|
| लोक संख्या | ४ कोटी | २३ कोटी |
| करांचें उत्पन्न | ८॥ कोट पौंड | ४० कोट रु |
| माणशी कर | २ ½ पौंड | १ ¾ रुपये |
| माणशी उत्पन्न | ४० पौंड | २७ ८० |
| करांचें उत्पन्नाशीं शेंकडा प्रमाण | ९.६ | ६.१ |

लार्ड हामिल्टन यांनीं विचार करावा कीं ज्याच्या जवळ ४० पौंड आहेत त्याला २। पौंड कर देणें कठीण पडेल किंवा इंग्लिश माणसाच्या २४व्या अंशानें उत्पन्न असणाऱ्या नेटिवास त्याच प्रमाणापेक्षां अधीक प्रमाणानें अधीक कर देणें कठीण पडेल. गरिबींत दिवस काढण्याचा प्रसंग आल्याशिवाय ही गोष्ट स्टेट सेक्रेटरीस चांगली कळेल असें वाटत नाहीं. वस्तुस्थितो खोटी ठरविणें ह्मणजे इंडियाच्या राज्यकारभारांत आंधळ्या कोशिंबीराचा खेळ खेळण्या सारखेंच आहे.

इंडियाच्या खजिन्यांत तूट मोठी आहे असें नाहीं. ६॥ कोट रुपयांची तूट ह्मणजे विलायत सरकारास कांहींच वाटत नाहीं. परभारें हवाला इंडियाच्या कर्ज काढण्याच्या सामर्थ्यावर दिला आणि लार्ड हामिल्टन यांनीं इंग्लंडच्या खजिन्याची मदत नको असें प्रौढीनें सांगितलें. इंग्लंडाला तोशीस नाहीं तोंपर्यंत इंडिया सरकारच्या व्यवस्थेंत हात घालण्याचें प्रयोजन पार्लमेंटाला नाहीं हें खरें पण अशा प्रकारची दावादाबी फार दिवस टिकावयाची नाहीं. ही दावादाबी पोरखेळांतली झाली. अखेर पर्यंत निभाव लागण्याची युक्ति ही नाहीं. इंडियांत कर्ज काढून खर्च भागविण्याची वेळ येते आणि ती वेळ सरकारास मोठ्या शांततेची वाटते हें मोठें दुश्चिन्ह होय.

भीक फार वाईट ह्मणून इंग्लंडानें ती इंडियाला नाकारावी हा अनुदारपणाचा व स्वार्थसाधुपणाचा कळस झाला असें ह्मटलें पाहिजे. आयर्लंड देशाला जर दरसाल लक्षावधी पौंड निरनिराळ्या रूपानें द्यावे लागतात तर इंडिया संबंधानें तोच विचार कायम ठेविला पाहिजे होता. पण स्वार्थामुळें विलायत सरकारास धर्मादायाची बुद्धिच होणार नाहीं हें उघड आहे. वेल्बी-कमिशनापुढें इंडियाच्या खर्चाचा हा प्रश्न निघाला होता आणि इंग्लंडाकडून कांहीं भाग वसूल करावा असें मत प्रसिद्ध होण्याच्या मार्गांत आहे तेव्हां देखील सरकारी लंपडाव व टाळाटाळ चालते हें मोठें लांछन होय.

## सकाळच्या कचेऱ्या

पुढील महिन्या पासून आकोल्याच्या कचेऱ्या सकाळीं ७ वाजतां भरून ११ वाजे पर्यंत चालूं राहतील असा हुकूम झाला आहे. उन्हाळा प्रखर भासू लागला ह्मणजे कचेरी सकाळीं भरविण्याचा परिपाठ पुष्कळ वर्षां पासून चालत आलेला आहे. सकाळच्या कचेरीचा हेतु असा कीं उन्हाच्या तापामुळें लोकांस चैन पडत नाहींसें होतें तेव्हां पक्षकार लोकास वृथा ताप होऊं नये, ऐन उन्हाच्या तलखींत त्यांनीं आराम घ्यावा, आणि सरकारी अंमलदारांसहीं सकाळीं काम संभाळून दोन प्रहरीं विश्रांति मिळावी. लोकांच्या सोयीं साठीं सकाळच्या कचेऱ्या केलेल्या असतात. लोकांची सोय सरकारच्या विचारांत प्रथम येते आणि लोकांस सुखावह होईल अशा रितीनें सरकार आपल्या कामाच्या योजना करिते. मूळ हेतु फार फार चांगला आहे परंतु अनुभव असा आहे कीं सकाळची कचेरी सुखकारक होत नसून मोठी तापकारक होते. असा आनष्ट परिणाम सरकारी अंमलदारांच्या काम करण्याच्या गैरशिस्ती पासून होत असतो. हा परिणाम यंदा होऊं नये आणि सकाळच्या कचेरीचा हेतु सफल व्हावा ह्मणून मुद्दाम आह्मी हें सूचनार्थ लिहिलें आहे. प्रत्येक अधिकाऱ्याचा पहिला नियम हा पाहिजे कीं ११ चा ठोका पडल्या नंतर एक पळभरही जास्त बसावयाचें नाहीं. काम थोडें होत गेलें तरी पुरवेल पण अवेळीं काम केल्यानें सर्वजणांस मोठी पीडा होते अधिकारी ह्मणजे सरकारचा गुलाम किंवा सदोदित चालणारें यंत्र नाहीं. कार्यवेळा सरकारानें पूर्वीच नियमित केल्या आहेत. त्या वेळा टळून देण्यांत येतात आणि अवेळीं उशीर होईपर्यंत पुष्कळ काम चालतें तेव्हां अधिकाऱ्यास लोक किती कंटाळतात हें कचेरीच्या मैदानांत फिणाऱ्या लोकांस चांगलें कळतें नियमितपणाच्या कामाला मोल मोठें आहे आणि ही गोष्ट सरकारी अधिकारी विसरणार नाहींत अशी आह्मास उमेद आहे.

इंडियाच्या सांपत्तिक स्थिती संबंधानें मि. हांडासाइड डिक या विद्वान अर्थशास्त्रज्ञानें खालील गोष्टी निर्णित केल्या आहेत:—(१) इंडिया देशाचा फायदा विजेत्या राज्यकर्त्यांनीं इतका घेतला आहे कीं हा देश कनिष्ट प्रतीच्या किंवा तिच्या पेक्षां कमी प्रतीच्या जीवनदशेला पोचला आहे. ही जीवनदशा मरणापेक्षां बरी दिसते पण असें जगणें मरण्या पेक्षां बरें नाहीं. (२) टांकसाळ बंद झाल्यानें विलायतच्या सोन्याच्या नाण्यास फायदा झाला. (३) जगांतील सर्व राष्ट्रां मध्यें इंडिया देश सांपत्तिक स्थितींत अगदीं खालीं आहे. (४) इंडियांत उत्पन्न निरनिराळ्या करांनीं इतकें वाढविलें आहे कीं आतां यापुढें नवीन कर बसविण्याची सोय नाहीं आणि प्रस्तुतचे खर्च प्रचंडपणानें वाढले असून ते उत्पन्नाच्या आंत येऊं शकत नाहींत. (५) इंडियावर कर्ज भारी आहे आणि कर्जाचें मान भयंकर होत चाललें आहे विलायतेस पौंडाच्या नाण्यामध्यें पुष्कळ कर्ज काढण्यांत आलें आहे. त्याचें व्याज रुपयाच्या भावानें पूर्वीं पेक्षा जवळ जवळ दुप्पट पडतें आणि हुंडणावळीच्या भावामुळें कर्जाची मूळ रक्कम रुपयामध्यें दुपटीनें द्यावी तेव्हांच तें कर्ज फिटेल. (७) इंडियांत रुप्याचीं नाणीं असल्यामुळें इतर राष्ट्रांशीं व्यापार करितांना या देशाचें मोठें नुकसान होतें. सर जेम्स वेस्टलांड यांनीं हे विचार ध्यानांत घेतले तर मोठें हित होईल. यंदा धान्यसमृद्धि आहे ह्मणून आनंद मानून लटका कैफ हिंदुस्थानच्या फडणीसांनीं आणूं नये. ही स्थिती केव्हां पालटेल याचा नेमच नाहीं. मि. दिनशा वाचा यांचा विचार राष्ट्रीय सभेच्या द्वारानें बाहेर पडतो ह्मणून कडू वाटत असेल तर निदान आपल्या राजसगोत्र्या मि. डिक साहेबांच्या या अभिप्रायाला योग्य मान देणें सर जेम्स यांचें कर्तव्य होय.

रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर बी. ए. एल. एल. बी. यांनीं 'मूकनायक' नांवाचें एक संगीत नाटक रचलें आहे. त्याचें वाचन येथील 'मित्रसमाजांत' कांहीं गृहस्थांच्या आग्रहावरून वरून झालें त्यावेळीं तें नाटक कानाला फार गोड लागलें. पद्यरचना गुजराथी नाटकाच्या चालीवर केली आहे. भाषा सरळ, मनोहर, व खुबीदार आहे. नाटकाची कथा अगदी साधी असून मद्यपानाचा प्रतिकार, प्रिय पात्रांच्या प्रेमातिरेकाचीं लक्षणें, उत्तम कोटींतला शृंगार इत्यादि गोष्टी चांगल्या साधल्या आहेत. या नाटकांत ध्वनित अर्थाची शोभा फार खुलते. हें नाटक रंगभूमीवर होईल तेव्हां तें प्रेक्षकास अतिशय आवडेल असा आमचा तर्क आहे. 'वीरतनय' नाटक हल्लीं किर्लोसकर मंडळी करीत असतात तें या गृहस्थांचा पहिला ग्रंथ होय. हा दुसरा ग्रंथ संविधानकानें लहानसा होईल खरा पण त्यांत सहृदय वाचकांस गोडी विशेष वाटेल.

अलिकडे शिकलेल्या लोका संबंधानें राजद्रोहाची टाळी सर्वत्र पिटण्यांत येत असते आणि बंडें उत्पन्न करण्यास व इंग्रजी राज्य बुडविण्यास शिकलेले लोक ह्मणजे जीवंत दारूगोळा आहे अशी वेदवाणी इंडिया सरकारच्या कौंसिलदारांच्या तोंडून निघते आणि तिचा योग्य प्रतिकार होत नाहीं ह्मणून सर्व देशभर एका प्रकारचें औदासिन्य पसरलें आहे. सर्व वातावरण निराशेच्या ढगांनीं व्याप्त असतांना निबिड अंधःकारांत एखादा आशाकिरण ही मनाला मार्गदर्शक व आल्हादकारक वाटतो. हा आशाकिरण आल्हाबाद युनिव्हरसिटीच्या गेल्या पदवीदानाच्या समारंभाच्या वेळीं आह्मास लाधला आहे. नामदार न्यायमूर्ती एकनन साहेब व्हाईसचान्सेलर या नात्यानें उत्तेजनपर गेल्या १७ वे तारखेस बोलले तेव्हां ते ह्मणाले कीं न्यायखात्यांत पदवीधर गृहस्थांस नेमल्या मुळें त्या खात्याच्या कामांत व सुधारणेंत अभिनंदनीय उत्कर्ष होत आहे या गोष्टीला खुद्द मीच मूळ साक्षीदार आहे. हा अभिप्राय व्हाईसरायच्या सरकारी कौंसिलदारांच्या तोंडात साखरच टाकीत आहे. वायव्य प्रांताचे लेफ्टेनंट गव्हरनर सर आनटोनी म्याकडोनाल्ड हे देखील नेटीव विद्वान लोकाचे खरे पुरस्कर्ते व हितकर्ते आहेत. त्यांनीं दर साल तीन डिपुटी कलेक्टरांच्या जागा पदवीधर गृहस्थाची परीक्षा घेऊन द्याव्या असें देण्याचा विचार केला आहे. सध्यां हा विचार कांहीं वर्षां पुरतांच आहे परंतु जर इष्ट फलसिद्धी होईल तर त्या प्रांतिक सरकारचा हा अप्रतिम उपकार चिरकाल चालेल.

ही वरील गोष्ट आमच्या प्रांतिक सरकाराला विशेष आवडेल असा आमचा ग्रह नाहीं. विद्येला मान मिळावा ह्मणून जगाच्या उत्पत्ती पासून सर्व ज्ञानी गृहस्थांचा आग्रह आहे परंतु श्री व सरस्वती यांचें वास्तव्य एकास्थळीं बहुधा घडत नाहीं. या सामान्य नियमाला आमचा वऱ्हाड प्रांत अपवाद होण्या इतकें भाग्य सध्यां वर्तमान नाहीं. भावी गोष्ट भविष्यवादी सांगतील.

## विविधज्ञानविस्तार

या मासिक पुस्तकानें आजपर्यंत मराठी

भाषेची कोणत्या प्रकारची सेवा केली आहे हें मराठी वाचकांस नव्यानें सांगावयास नको. गंभीर विषयांवर लिहिलेल्या लेखांनीं पूर्ण अशीं जीं कांहीं मासिकें इंग्लंडमध्यें सर्वविश्रुत आहेत त्यांच्या मालिकेंत बसण्या जोगें जर मराठींत प्रसिद्ध होणारें एखादें मासिक पुस्तक असेलच तर तें 'विविधज्ञानविस्तार' होय यांत संशय नाहीं. विषयांच्या काठिन्यामुळें, चालकावर वेळोवेळीं आलेल्या अपरिहार्य संकटा मुळें आणि आमच्या सुशिक्षित लोकांतही आढळून येणाऱ्या उदासीनतेमुळें, हें मासिक जितक्या नियमितपणानें चालणें इष्ट होतें तितक्या नियमितपणानें तें निघत नव्हतें. यांतील सुंदर लेखांनीं धावावलेल्या वाचकांना पुष्कळ वेळां पहिल्या तारखेच्या पुढेंही बरेच दिवस चुरमुरे खात बसण्याचा प्रसंग येई. आणि फलसिद्धीच्या सुखापेक्षां आशेच्या सुखावरच गुजारा करणें भाग पडे. गेल्या जानेवारी महिन्यापासून हे अधिक नेमस्तपणानें निघूं लागलें आहे. दर अंकाच्या पृष्ठामध्यें आठ पृष्ठांची भर पडल्यामुळें एखादें वेळीं पूर्वींप्रमाणें थोडासा अनियमितपणा घडल्यास त्याबद्दल चालकांवर वाचकांचा रोष होण्याचाही संभव नाहीं. विषयाचें विवेचन किती ह्रदयंगम रीतीनें आणि निष्पक्षपातित्वानें केलें आहे याचा अनुभव मार्च महिन्याच्या अंकांतील 'पुनरुद्धार' हा निबंध वाचून लागलींच येईल. त्याच प्रमाणें 'रावसाहेब मंडलिक यांचें चरित्र' 'करण वाघेला' फिरंग्याचा इतिहास' इत्यादि वाचून करमणूक व बोध दोन्ही एकदम होण्या सारखी आहेत. सारांश, मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्यानें यास आपला उदार आश्रय द्यावा अशी आमची मनःपूर्वक शिफारस आहे.

---

हिंदुस्थानचे फडणीस सर वेस्टलांड यांनीं १८९८-९९ सालच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक व्हाईसराय साहेबांच्या कायदे कौंसिला पुढें मांडलें आहे. हा बजेटाचा खर्डा मोठा असमाधानकारक आहे. सालाचें उत्पन्न व इतर करांचें उत्पन्न मिळून जी जमा होईल तिच्या जवळजवळ खर्च ही अगदीं बरोबरीनें होईल. अगदीं थोडी शिल्लक दाखविण्यांत आली आहे.

| | रुपये |
|---|---|
| जमा | ९२,०८,९४,००० |
| खर्च | ९८,१९,४०,००० |
| | ८९,१४,००० |

शिल्लक काय ती ८९।९० लक्ष रुपये काढली आहे परंतु खरोखर साल अखेरीला या सालची तूट पडते किंवा बरोबरी होते हें कांहीं सांगवत नाहीं. या खर्चाच्या आंकड्या मध्यें दुष्काळा निमित्त १॥ कोटी रुपये आकारले असून सरहद्दीवरील लढाईसाठीं १॥ कोटी व गोऱ्या फौजेला जास्ती पगार देण्या साठीं २ कोटी मिळून ३॥ कोटी रुपये धरले आहेत.

यंदा पीकपाणी उत्तम झालें ह्मणून सरकार आनंदाच्या लहरींत आहे. परंतु वर दाखविलेली शिल्लक ह्मणजे खरी शिल्लक नाहीं. मागील कर्जें कायमच आहेत. गेल्या वर्षीं जी सुमारें ६ कोटीची तूट पडली ती कायमच आहे. १८९७ सालचीं पिकें इतकीं उत्तम आलीं कीं लोकांच्या आठवणींत अशीं पिकें कधीं नव्हतीं. या उत्तम स्थितीनें लोक दुष्काळाच्या दुःखांतून निवाले आहेत. मुलकी जमाबंदीच्या कागदावरून असा अंदाज निघतो कीं लोक चांगल्या आबादानीखालीं राहतात. सरहद्दीवरील रानटी लोक शरण येऊन शांतता होईल असा रंग दिसतो. पुढील वर्षाच्या हिशोबामध्यें सुखसमृद्धीचे दिवस प्राप्त झाल्याचे परिणाम दिसून पडतील तथापि रणसंग्रामावर लढाई चालूं ठेवण्याबद्दल आगाऊच खर्चाची योजना केली आहे" हे उद्गार आनंदकारक वाटतात परंतु ही सुखसमृद्धी सर वेस्टलांड यांच्या मनःसृष्टींत आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, MARCH 28, 1898.

---

The financial position of India is most unsatisfactory and the chances are that it will get on worse and worse. In the case of an individual indebtedness means slavery and loss of all powers of utility. Similarly indebtedness of a nation is the slow but sure cause of its ruin if the nation does not possess funds to square off the debts. Finances make up a state what it is and the next corollary to this proposition is that civilization stops at the very beginning of the loss of the financial equilibrium. India is a vast nation but it is the poorest in the lot of all nations. Sir James Westland presents his annual budget of 1898—99. The last year closes with a deficit of nearly 6 crores of Rupees. The Finance minister thinks it to be no part of his duty to secure material prosperity by checking the rank growth of the nation's debts. All his thoughts are directed to make both the ends meet. But he never devises means to curtail the expenditure so as to bring it within the easy limits of the highest revenue that the Nation can raise by taxing people to the utmost degree. With no chances of further augmenting the revenue the Finance Minister should try to evade the national bankruptcy that threatens to be a reality in no distant future. The provincial governments have been pinched to the last pie available and all works of public utility have been suspended to meet the Imperial demands. India best exemplifies the tapping of all blood-vessels to pay for the enormities of an extravagant administration. No reader will be satisfied with Sir James Westland's hopeful forecast when he remarks:—

"But there is also a brighter side in my statement. The harvests of 1897 have been more bountiful than any within recent memory, and the recovery from the effects of famine and scarcity promises to be a very rapid one. The Revenue returns of January were sufficient in themselves to shew that the crisis had passed, and gave hopes of early return of prosperous times. And at the present moment there are signs of peace on our frontiers and of the submission of the still outstanding tribes to the General Commanding our forces. Our financial position for the year that is about to open will therefore, I trust, be a reflection of times of returning peace and prosperity, although as peace is not yet assured to us, I am obliged to include in my estimates of expenditure a considerable provision not only for the return of our troops from the theatre of war, but also for the possible resumption, before their return, of military operations."

---

Munashi Azizuddin returned on Saturday last to his substantive appointment at Akola. He thus removes the great want of an Assistant Commissioner felt at the head quarters of the district. He was temporarily shifted to the Khamgao—subdivision but had to remain for some 4 months until arrangements could be made to relieve him. During his short stay he made himself known and felt in all circles. His is a unique personality and it is a pleasure to note that his work came up to the mark of people's taste and appreciation. On Friday last there was the special recognition of his merit when, on the eve of leave—taking, he was entertained at a public Pansupari. At the well—known firm of Shriram Shaligram there was a social gathering of men from all ranks and grades to do him honor. Mr. Annekar a local pleader was their spokesman. He echoed well the general sentiments when he expressed that Munashi Azizuddin was the people's man as a judge, magistrate and revenue-officer. There was also a large crowd at the Station to bid him good—bye. A still more pleasant programme was witnessed at Shegao when Mr. Hari Kukaji was the prominant figure to arrange a public pansupari for him.

---

The Finance Minister summarizes his twenty years' finance as follows:—

"So far as Revenue goes, we have even after charging off Rx. 13,650,000 spent from Revenue account on Railway construction, more than paid our way, including all expenditure on war, special defences, and famine. So far as capital transactions go, we have raised under various conditions and spent upon Railways, Irrigation Harbour Works and Docks, Municipal projects, and Agricultural Improvements a sum equal (at 16 pence the rupee) to Rx. 193,820,000; and we are after all this expenditure better off by Rx. 500,000 a year than before we undertook it. I am dealing, it must be remembered, with direct financial returns only: the effect of all this expenditure on development of Revenue and its economic and administrative aspects lie outside my present purpose."

---

The statement is highly misleading. He wisely omits to consider how the taxation is rapidly increasing "to pay our way." His theory of a bogus surplus falls to the ground if he digest well the following figures which Mr. D. E. Watcha quotes to give him a direct lie. Let Sir Westland realize the grand effect of his make—shift in the face of the following facts which these figures indicate:—

| | Rx. |
|---|---|
| "Assessed Taxes ......... | 9,020.000 |
| Salt Duty ............ | 10,281,000 |
| Customs ... ... ... | 3,065,000 |
| Total ... ... | 22,366,000 |

But these figures only relate to taxation for ten years commencing from 1885 86. I have now computed the entire taxation, enhanced and fresh imposed since 1878 79, and the results, *after taking into consideration the remission of dutis during the same period*, are as under:—

From 1878—79 to 1897-1898.

| | Rx. |
|---|---|
| Salt ... ... ... ... | 10,418,000 |
| Provincial Rates ...... | 15,156,000 |
| Assessed Taxes ... ... | 17,034,000 |
| | 42,608,000 |
| *Less* Customs Loss on account of old duties remitted in 1878 and 1882 ... ... ... ... | Rx. 11,159,000 |
| *Deduct* fresh duties imposed since 1893 95 ... | 8,436,000 |
| | 2,663,000 |
| Net Enhanced New Taxation | Rx. 39,945,000 |

It will be seen from above figures (they are open to correction if I am wrong) that the new taxation during the twenty years amounted to nearly 40 crores. The rest of the increase of nearly 11 crores may be fairly put down to the normal growth of revenue, save on the item of opium, which is steadily diminishing and soon threatens to be a negligible quantity in future budgets.

| | Rx. |
|---|---|
| Growth in Land Revenue ... | 6,032,000 |
| „ Stamp ... ... | ...1,813,000 |
| „ Excise ... ... | 3,259,000 |
| „ Other heads ... | ... 2,300,000 |
| | 13,404,000 |
| *Less* diminished opium receipts ... ... ... | 3,853,000 |
| | 9,551,000" |

---

## वऱ्हाड

हवामान—उत्तरोत्तर उन्हाळा वाढत आहे. पण मधून मधून हवेंत थंडावा व उष्मा वारंवार बदलतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. काल रात्रौ वादळ होऊन पाऊस पडला.

मुनशी अजिजुद्दीन असिस्टंट कमिशनर हे परवां शनिवारीं परत आकोल्यास रुजू झाले. त्यांच्या सन्मानार्थ खामगांवास श्रीराम शालिग्राम यांच्या दुकानावर, स्टेशनावर व शेगांवास स्टेशनावर पानसुपाऱ्यांचे समारंभ झाले.

रा० रा० नीळकंठ नारायण भट हे उमरावतीस डिपुटी इनस्पेक्टरच्या जागीं जात असल्यामुळें त्यांचा बुलढाण्याचा चार्ज व आकोल्याचा चार्ज रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं घेतला.

रा. रा. गणेश बापूजी उटगीकर एक्स्ट्रा असि. कमिशनर हे यवतमाळास जातांना वाटेंत आकोल्यास मित्रमंडळीच्या भेटीसाठीं उतरले होते.

कर्नल मेकेंझी माजी—रेसिडेंट हे उमरावतीहून परत गेल्या बुधवारीं भुसावळे कडे रवाना झाले. येथील स्टेशनावर मि. प्रीडो साहेबांनीं त्यांच्या सन्मानार्थ पानसुपारीचा समारंभ केला होता.

मि० मार्शल एक्स्ट्रा असि. कमिशनर खामगांव कोर्टावर येऊन रुजूं झाले.

मि. एम. रामय्या असि. इंजिनिअर, वाशिम यांस पश्चिम वऱ्हाडांत गेल्या १ ले तारखे पासून बदललें.

वऱ्हाडांत चालूं साला करितां २६ हायकोर्ट प्लीडर व ९९ वर्ग २ चे प्लीडर मिळून १२५ वकील आहेत.

राव बहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी० ए० डायरेक्टर हे पुढील महिन्याच्या १२ वे तारखे पासून दोन महिन्यांच्या रजेवर पुण्यास जाण्याच्या विचारांत आहेत.

---

## वर्तमानसार

कांहीं फरारी आफ्रिदी लोकांस काबूलच्या अमिरानें काबुलाहून अफगाण तुर्कस्थानांत पाठवून दिलें. शाका खेल लोकांचे पुढारी खबासखान वलीमहमद यांस अमिरानें असें बजावलें आहे कीं, तुह्मी इंग्रजाशीं तह करा अगर अफगाण हद्दींतून चालते व्हा. इंग्रजांशीं सल्ला न करतां तसेंच अफगाण हद्दींत राहाल तर तुह्मासही तुर्कस्थानांत घालवून देण्यांत येईल. कारण माझा हुकूम अमलांत आलाच पाहिजे.

चीनानें इंग्लंड व जर्मनी यांच्यापासून कर्ज घेण्याचें योजलें असून त्यास रशिया व फ्रान्स यांनीं हरकत आणली आहे आणि आमच्यापासून कर्ज घेत नसल्यामुळें आह्मास कांपनसेशन द्या असा त्यांणीं चीनाजवळ तगादा लावला आहे.

तुह्मी ताब्यांत घेतलेलें पोर्टअर्थर बंदर खालीं करून द्या असा चीनानें रशियाच्या मागें तगादा लावला आहे. रशिया ह्मणतो त्या ठिकाणीं रशियन लोक असणें हें चीनच्या फायद्याचें असून शांतता राहाण्यास कारण आहे!

पोर्ट अर्थर भाड्यानें घेण्याबद्दल रशिया खटपट करीत आहे.

कियाचो ठिकाण ज्या शर्तीवर जर्मनीस दिलें त्याच शर्तीवर पोर्ट अर्थर आपल्यास मिळालें पाहिजे आणि पिटुनापासून पोर्ट आर्थरपर्यंत रेल्वे करण्याचा हक्कही मिळाला पाहिजे आणि तो न मिळाल्यास आपण आपली फौज मांचोरिया येथें पाठवूं अशी रशियानें चीनास धमकी दिली आहे आणि पांच दिवसांत जबाब मागितला आहे.

रशिया आपली फौज चीनकडे नेत आहे.

कोरियानें आपलें एक बेट रशियास भाड्यानें दिलें.

पोर्ट आर्थर व तालेनव्हान हीं ९९ वर्षांच्या करारानें आपणास भाड्यानें देण्याचा करार ता. २६चे आंत पुरा करावा असा रशियानें चीनचे मागें तगादा लावला आहे.

ठा. अ.

विलक्षण अवधानचमत्कृति—प्रसिद्ध शतावधानी पंडित श्रीरंगाचार्य किंवा कै. पंडित गट्टूलाल यांच्या अवधानचमत्कृती प्रमाणें हेलुरचे कोणी श्रीनिवासराव नांवाचे एक गृहस्थ आहेत ते करून दाखवीत असतात व तशी अवधानचमत्कृती त्यांनीं नुक्तीच मद्रास येथें तेथील गव्हरनर सर आर्थर हाव्हलॉक, त्रावणकोरचे महाराज आणि तसेंच मद्रास येथील थोर थोर गृहस्थ यांचे समोर दाखविली. त्यावेळीं इंग्रजी, फ्रेंच जर्मन, ग्रीक, इटालियन व रशियन ह्या भाषांतील कवितांचे चरण, त्यांतील शब्द आगेमागें करून, हा अमक्या नंबरचा शब्द असें ऐकून, मागाहून ते सर्व कविताचरण यथाक्रमानें बिनचूक सांगण्यांत आले. व ही सदर अवधानी प्रोफेसराची विलक्षण स्मृति पाहून सर्व लोकांनीं त्यांची फार वाहावा केली हें सांगणें नकोच. ह्या अवधानचमत्कारानीं प्रेक्षक अगदीं गुंग व थक्क होऊन जाती, हें कांहीं खोटें नाहीं. व ह्याप्रमाणेंच मद्रासचे गव्हर्नर व त्रावणकोरचे महाराज हे थक्क झाले असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. एवढी जाज्वल्य स्मृति ईश्वरानें सर्वच मानवी मस्तिष्कांत ठेविलेली नाहीं. ती क्वचित् लोकांचे डोक्यांत असलेली दिसते.

√वृद्धवचनसंग्रह—(१) अपमान होऊन तुटलेले प्रेम नवीन जोडून देण्यास कोण समर्थ आहे? फुटलेलें मोतीं लाखेच्या लिंपणानें सांधलें जात नाहीं. (२) सापाप्रमाणें सत्वरज तमोगुणांपासून दूर असणारा, विषभक्षण प्रमाणें पराच्न समजणारा आणि राक्षसीप्रमाणें स्त्रीस मानणारा त्याला गात्र विद्याप्राप्ति होते. (३) मनुष्यांना सन्निकट असलेल्या वस्तूंविषयीं अनादर उत्पन्न होतो असा नियम आहे; भागीरथीच्या कांठीं राहणारे लोक देहशुद्धी साठीं दुसऱ्याच नद्यावर जातात! [४] सायंकालीं प्रकाश देणारा चंद्र असून पहाटे उजेड देणारा सूर्य आहे. त्याचप्रमाणें तिन्ही लोकीं प्रकाश पाडणारा धर्म हा दिवा असून, वंशामध्यें सुपुत्र असला ह्मणजे तो सर्व कुलाला दिव्याचे ठिकाणीं होतो! [५] हळूहळू विद्या संपादन करावी हळूहळू द्रव्य मिळवावें, हळूहळू पर्वतावर चढावें आणि हळूहळू मार्ग चालावा. [६] हळूहळू चालून मुंगी सुद्धां हजारों योजनें चालून जाते. परंतु मुळींच चाललें नाहीं तर गरुड सुद्धां एक पाऊल पुढें जाणार नाहीं. [७] विद्वान्, मूर्ख, बलवान, अशक्त, सुष्ट दुष्ट. श्रीमंत आणि दरिद्री हे सर्व मृत्यूला सारखेच आहेत. (८) विष आणि विषय यांमध्यें फार अंतर आहे. विष खाल्लें तर प्राणहानि होते; आणि विषयाचें तर नुसतें स्मरण झाल्याबरोबर प्राणहानि झाल्यासारखी होते! (९) थोरांना अयोग्य तें योग्य होऊन हलकयांना योग्य तें दूषणावह होतें: राहूस अमृत हें मृत्यूसारखें असून, शंकराला विष हें भूषणावह झालें आहे! (१०) ज्याचें अंतःकरण दयाळु असून भाषण सत्यवाणीनें युक्त व शरीर परहित करण्यांत तत्पर असें आहे त्यास कलि काय करणार आहे? प्रीति संपत्ति, खर्च आणि श्रम हीं प्रत्येकीं कसकशीं असावीं?—प्रीति ही लोभापासून दूर असावी, संपत्ति दुसऱ्याचें वैर करण्यापासून अलिप्त असावी आणि खर्च हा दुसऱ्याचें करितां होऊन श्रम परोपकारार्थ व्हावे. अशी त्या चौघांचीं रूपें आहेत. (१२) या जगाला वश करून घेणें असेल तर एकच गोष्ट करावी ती ही:—परानदारूप धान्यांवर चारणाऱ्या वाणीरूप गाईला दूर राखा, ह्मणजे झालें. कोणाचीही निंदा केली नाहीं ह्मणजे सगळें जग आपलें स्वाधीन आहे असें समजावें. परनिंदेनें जग आपल्याला परकें होतें.

रोमचा पोप हा जगांतील अति विख्यांत श्रीमान् लोकांपैकीं एक आहे. त्याच्या वाड्याला सात हजार खोल्या असून त्या सर्वांमध्यें निरनिराळ्या प्रकारचें उंची उंची सामान भरून व्यवस्थितपणें त्या खोल्या सुशोभित केल्या असतात. त्या सर्वांमध्यें नुसत्या सोन्याच्या वस्तु ४० लक्ष पौन्डांचे (६ कोट रुपयांच्या) किंमतीच्या आहेत. ही किंमत त्या वस्तूंना लागलेल्या नुसत्या सोन्याची आहे. ह्या किंमतीशिवाय त्या वस्तूंची घडणावळ वेगळी आहे. ह्मणजे सुमारें ७८ कोटीच्या सोन्याच्या जिनसा ह्या वाड्यांत आहेत. ह्यावरून त्याचे इतर सर्व संपत्तीचा व वैभवैश्वर्याचा कोणालाही अनमास होईल.

ज्ञा. प्र.

बर्मिंगहाम शहरांतील कारखानें.

इंग्लंडमध्यें कारखान्यांविषयीं जीं शहरें प्रसिद्ध आहेत, त्यांत बर्मिंगहाम शहरचा नंबर बराच वर लागेल. त्या शहरांतील सर्व कारखान्यांत एका आठवड्यांत किती माल तयार होतो हें पाहिलें ह्मणजे त्या शहरांतील कारखान्यांची थोडीबहुत कल्पना होईल. १,४०,००,००० टांक ६,००० लोखंडी पलंग, ७,००० बंदुका ३०,००,००,००० खिळे, १०,००,००० बटणें, १,००० खोगिरें, ५०,००,००० तांब्याची किंवा पंचरशी धातूचीं नाणीं २०,००० चष्मे, ४,५०,००० रुपयं किंमतीचें जवाहिर, ४,००० मैल लांबीची लोखंडी किंवा पोलादी तार, १० टन वजनाच्या टांचण्या, ३५० मैल लांब लाखेच्या कांड्या व तांब्यापितळेचीं ८००० टन वजनाचीं भांडीं; या शिवाय बारीकसारीक जिनसा तयार होतात त्या शिवायच!

पोहण्याचा, लांकडें फोडण्याचा, हे व्यायाम सर्वांत उत्तम अशी आजपर्यंत समजूत होती. पण एका नवीन विद्वान् डाक्टराचें असें ह्मणणें आहे कीं, 'खणण्या' सारखा उत्तम व्यायाम दुसरा कोणताच नाहीं. खणण्याच्या योगानें प्रत्येक स्नायु, धमनी, शीर यांना व्यायाम होतो. दिवसांतून एकदां किंवा दोनदां एक तासभर खणण्याचें श्रम केल्यास उत्तम भूक लागते, पचनशक्ति वाढतें व रात्रीं गाढ झोंप येते.

ग्रीनलंड बेटाच्या किनाऱ्यावर सांपडणारे 'देवमासे' ४०० वर्षे पर्यंत जगतात.

तारुण्यांत जितकें अन्न जरूर असतें, त्याच्या निम्मे किंवा तृतियांश फार ह्मातारपणीं पुरे होतें.

'ब्रिटिश म्यूझियमला गेल्या १४३ वर्षांत दरसाल १६५,००० रुपयेप्रमाणें खर्च झाला आहे.

अमेरिकेंतील मेक्सिको देशांत एक प्रकारचे फूलझाड आहे. त्याला मोठें तांबडे फूल येतें. त्याची प्रत्येक पाकळी अगदीं मनुष्याच्या हाताच्या आकाराची असते, ह्मणून त्याला 'हस्तपुष्प' असें ह्मणतात.

कॉलोराडोच्या अरण्यांत पावसाच्या सरीवर सरी कोसळतात, पण खालीं जमिनीवर एक थेंब पडत नाहीं, कारण ढगांतून पाऊस खालीं पडूं लागला कीं ती खालच्या रूक्ष हवेंत आल्याबरोबर त्याची वाफ होऊन जाते.

तमाखुवरील कराचें जितकें उत्पन्न होतें, तितकें दुसऱ्या कोणत्याही जिनसाचें होत नाहीं. गेल्या २७ वर्षांत अमेरिकन सरकारला तमाखुवरील कराचें उत्पन्न ३,००,००,००,००० रुपये झालें!

क०

अमेरिकेंत सेंटल्युई येथें एक तरूण मनुष्य नोकरी करीत असे. थोड्या महिन्यांपूर्वीं कांहीं सणानिमित्त त्यांस सुट्टी मिळाली होती. त्या वेळीं कोठें तरी मासे धरावयास जाण्याचा त्यानें विचार केला. पुढें अयर्नमौंटन रेल्वेनें तो अर्कान्सास येथें जावयास निघाला. पण तेथें न जातां वाटेंत तो बाल्डनाब येथें उतरला. आणि तेथून मर्फी नांवाच्या सरोवराकडे जाऊन तो कोठें तरी मुक्काम करण्याच्या तजविजींत होता. आतां पुढें काय करावें वगैरे कांहीं विचार करतां करतां चिखलांत रुतलेल्या एका चकाकणाऱ्या पदार्थाकडे सहज त्याची नजर गेली. दुरून तें मोतीं असावें असें त्यांस वाटलें. त्याला मोत्याची परीक्षा मुळींच नव्हती, तथापि तो चमकणारा पदार्थ चिखलांतून उचलून घेऊन तो ह्याच्याकडे निरखून पाहूं लागला. त्यानें वाटाड्या ह्मणून एक ह्मातारा शिद्दी बरोबर घेतला होता. तो त्यास ह्मणाला कीं, जवळच एका सखल जमिनींत असले पदार्थ हजारों आहेत. आह्मा शिद्दीलोकांची मुलें यांचा खेळ करितात. पुढें त्या वाटाड्याबरोबर जाऊन त्यानें ती जागा पाहिली व तेथून त्यानें तीं मोतीं खिसे भरून घेतलीं. तो शिद्दी मनांत ह्मणाला कीं, हा मनुष्य केवळ वेडा आहे. ही गोष्ट अरेबियननैट मधील सिंदबाद दर्यावर्दीच्या गोष्टीसारखी वाटेल. परंतु तसें नाहीं. त्यानें गोळा केलेलीं सर्व मोतीं खरीं होतीं. त्यानें त्या पैकीं कांहीं मोतीं सेंटलुई येथें पाठविलीं, तेथें तीं मोतीं खरीं ठरलीं इतकेंच नव्हे तर तीं फार उंच प्रतीचीं आहेत असें ठरलें. पुढें त्यानें एक पोतें भरून तीं मोतीं मेंफिस येथें पाठविलीं. कांहीं दिवसानीं त्यास असें समजलें कीं, तेथील शिद्दी लोकांच्या मुलांजवळ भोकरा एवढालीं टपोरीं मोतीं आहेत त्यानें तीं सर्व त्याचेपासून विकत घेतलीं. मग मेंफिस येथें अशी बातमी फुटली कीं, आर्केन्सामध्यें मोत्यांच्या खाणी आहेत. परंतु सर्वजण ह्मणत कीं, ही केवळ गप्प आहे. कारण तेथें भिडाच्या खाणी आहेत ही गोष्ट सर्वांस ठाऊक होती. अखेरीस मेंफिस येथील मोत्यांचा धंदा करणाऱ्या एका सावकारानें आपला एक रत्नपारखी मुद्दाम तेथें पाठविला. त्यानें परत न जातां आपल्या कामाचा राजिनामा पाठवून दिला त्यावरून त्याच्या स्नेह्यानीं अटकळ केली कीं, तेथें खरोखरच कांहीं तरी लाट सांपडला आहे. ह्मणून त्यानीं दुसरा एक रत्नपारखी तेथें पाठविला. त्यानें एका दिवसांत प्रत्येकीं १०० पासून ३०० पौंडपर्यंत किंमतीचीं तीन मोतीं गोळा केलीं, व त्याचे शिवाय त्यानें दुसरींही पुष्कळ पाणीदार व गोळीबंद अशीं मोतीं जमा केलीं. व्हाइट रिव्हर नदीच्या योगानें ज्या दलदली झाल्या आहेत त्यांतून हीं मोतीं निघालीं असें आतां निश्चयानें समजलें आहे, व तेथील सर्व लोक आतां ह्याच कामाच्या मागें लागले आहेत तथापि सर्वांच्या शेवटीं जो एक सावकार तेथें गेला, त्यानें ती सर्व जमीन व मर्फी तलाव व त्याच्या आसपासची सर्व जागा भाड्यानें घेतली आहे. तिचे भोवतालीं हत्यारबंद शिपायांचा त्यानें एक वेढा बसविला आहे. तसेंच इंडियानापोलिस येथें मुद्दाम त्या कामाकरितां सरोवराचा तळ खरडून काढण्याचीं यंत्रें तो तयार करीत आहे. मोतीं गोळा करणाऱ्या दुसऱ्या सर्व लोकांचा धंदा आतां बंद झाला आहे. या करितां व्हिस्की दारूच्या बाटल्या देऊन सिद्दी लोकांच्या मुलाजवळून त्यांचीं खेळण्याचीं मोतीं जमा करण्याचें काम हल्लीं कोणी कोणी करीत आहेत.

क०

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.